
# श्री साईलीला



"कुत्र्याला नि डुकराला वाढलेल्या भाकरी मलाच पोचल्या." श्री साईबाबा.

जून ) किमत ६० पैसे ( १९७७

# अनुक्रमणिका - जून १९७७


| | | |
|---|---|---|
| १ | संपादकीय | — श्रीसाईलीलेचा साहित्यिक दृष्टीकोन |
| २ | गाठीभेटी | — सदानंद चेंदवणकर |
| ३ | युगावतार श्रीसाई-१० | -- श्री. चंद्रकांत सामंत |
| ४ | श्रीसाईबाबांचा प्रसाद | — सौ. अनिता अनंत नाईक |
| ५ | श्रीसाईबाबाय नमः | -- डॉ. शामसुंदर शंकर तेंडुलकर |
| ६ | भक्तांची काळजी बाबांना | — सौ. सरला सूर्यकांत गर्जे |
| ७ | मन ! मन ! मन ! | — सौ. आशा दयानंद इंगळे |
| ८ | कर्मयोग | — श्री. पांडुरंग भुजबळ |
| ९ | श्रीसाईबाबांचे साक्षात् मीलन | — श्री. शंकर बा. नानोटी |
| १० | नामे तारिले पाषाण | — श्री. वि. अ. कुलकर्णी |
| ११ | भक्ती | — श्री. दिलीप दत्तात्रय जोशी |
| १२ | श्रीसाईनाथ मंदिराचे भव्य उद्‌घाटन— | |
| १३ | ग्रंथभेटीचा स्वीकार | — |
| १४ | साईनाम नित | — लक्ष्मीतनया |
| १५ | श्रीसाईगीत | — श्री. पी. आर. जोशी |
| १६ | शिरडीच्या वाटेवर | — श्री. विजय हजारे |
| १७ | पूर्तता | — श्री. जयवंत ना. आंबेरकर |
| १८ | श्रीसाईनाथांची भूपाळी | — श्री. मुरलीधर घोलप |
| १९ | मागणे | — श्रीराम आटवले |
| २० | शिरडीचा राणा | — श्री. स. मा. मुऱ्हार |
| २१ | शिरडीमें हुए साईनाथ | — श्री. हसमुख ओंकार पाटील |
| २२ | प्रकाश पूजा | -- श्री. चंद्रशेखर लिगाडे |
| २३ | साई के उपकार | — कु. अनारबाला शिवलकर |
| २४ | बाबा बैसले शिळेवरी | — कु. शालिनी स. देशपांडे |
| २५ | श्रीसाईंचा पाळणा | — रखमाताई डोंगरे |
| २६ | शिरडी वृत्त | — |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

चारी पुरुषार्थांच्यावरी ।
या पंचम पुरुषार्थाची पायरी ।
कांहीं न पावे या योगाची सरी ।
अलौकिक परी भक्तीची ॥ ६१ ॥

गुरु सेवेनें जो होई कृतार्थ
तया आकळे हें वर्म हे यथार्थ ।
भक्ति ज्ञान वैराग्य—स्वार्थ ।
तोचि परमार्थ पावेल ॥ ६२ ॥

गुरु आणि देव यांत ।
भेद पाही जयाचें चित्त ।
तेणें अखिल भागवतांत ।
नाहींच भगवंत देखिला । ॥ ६३ ॥

वाचिलें अखिल रामायण ।
ठावी न रामाची सीता कोण ।
सांडूनियां द्वैत दर्शन ।
गुरु-देव अभिन्न जाणावे ॥ ६४ ॥

घडतां गुरुसेवा निर्मळ ।
होईल विषयवासना निमूळ ।
चित्त होईल शुद्ध सोज्वळ
स्वरूप उज्ज्वल प्रकटेल ॥ ६५ ॥

—श्रीसाईसच्चरित्—अध्याय २४ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] जून ७७ [ अंक ३

: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

**स. न. वि. वि.**

# श्रीसाईलीलेचा साहित्यिक दृष्टीकोन

● आमच्या मागील मे १९७७ च्या अंकात आम्ही श्रीसाईलीलेचा अगदी पहिल्या अंकातील - चैत्र शके १८४५ इ. सन १९२३ च्या अंकातील - छापलेले संपादकीय जसेच्या तसेच छापले होते त्यावेळी संपादकांच्या समोर दोन दृष्टीकोन होते.

१) श्रीसाई सच्चरिताचे प्रकाशन.

२) श्रीसाईभक्तांना आलेले श्रीबाबांचे अनुभव.

आज संपादकांचा पहिला हेतू संपूर्णपणे साध्य झालेला आहे, आणि आता दुसरा हेतू जो आहे तो कायम राहाणारा आहे.

असंख्य साईभक्त आपले बाबांचे संबंधीचे आलेले दृष्टांत - अनुभव आमचेकडे पूर्वीपासून पाठवीत आलेले आहेत, पाठवीत आहेत व यापुढेही कायम पाठवीत राहातील यात शंकाच नाही. हे अनुभव प्रकाशित करण्यासाठीच हे मासिक आहे यात वाद नाही. परंतु हे अनुभव लिहून पाठविणाऱ्या बहुसंख्य भक्तांना लेखनाचा मुळीसुद्धा सराव नसतो. धरला हाताशी येईल तो कागद व त्याच्यावर सुचेल ते खरडले व तो कागद मासिकाकडे पाठवून दिला की काम झाले ! आपला लेख पुढे छापला गेला व तो चार चौघांना मोठ्या आनंदाने दाखविला व पुन्हा पुन्हा तशाच प्रकारे शुद्ध लेखनाच्या काना, मात्रा, वेलांटी, अनुस्वार इ. च्या साध्या नियमांकडे पण लक्ष न देता खरडले व पाठवून दिले हे असे आतापर्यंत चालत आले आहे. काही भक्त तर मजकूर कागदाच्या दोन्ही

बाजूना लिहून पाठवितात. यावर ताण म्हणजे काही लेखक मंडळी आंतरदेशीय पत्राच्या दोन्ही बाजूस तर कित्येक जण पोस्ट कार्डावर मजकूर लिहून पाठवित असतात. यामुळे संपादकांची अवस्था काय होत असेल याची प्रिय भक्तांनो आपणाला कल्पना नाही. कित्येकदा भिडेस्तव आलेला मजकूर पुन्हा लिहावा लागतो. कित्येकदा चुका दुरुस्त करून सुधारावा लागतो. कागदाच्या दोन्ही बाजूला लिहिलेला मजकूर पुन्हा पुन्हा सूचना देऊनही लेखक मंडळी समजून घेत नाहीत व शेवटी मुद्रणाच्या दृष्टीने गैरसोयीचा असा मजकूर नाईलाजाने आम्हास परत पाठवावा लागतो. लेखकांच्या या अशा वृत्तीमुळे, त्यांचा मजकूर तर प्रसिद्ध केला जात नाहीच किंवा त्यांचा निर्णय लौकर घेणेही शक्य होत नाही. अकारण विलंब होतो व उभयपक्षी पत्रव्यवहार वाढत जातो. तेव्हा भक्तांनी आपापला मजकूर आता यापुढे पाठविताना तो मुद्रण-छपाईच्या दृष्टीने सुलभ व सोईस्कर व्हावा यासाठी कृपया कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावा ही विनंती.

आमचे मासिक अगदी छोटेखानी आहे. अवघे ४८ पानांचे. काही लेखक व कवी आपली हजेरी प्रत्येक अंकात लागावी, आपला लेख प्रत्येक अंकात छापून यावा यासाठी मोठा आग्रह धरतात. यामुळे मजकूर पाठविणाऱ्या सर्वच लेखक-कवी मंडळींना:वाव मिळत नाही ही गोष्ट खरी आहे; तसा हट्ट-आग्रह कृपया टाळावा. कित्येकदा लेखक लेख पाठविताना तो जास्तीत जास्त विस्ताराने व लांबच लांब पाठवितात. हे अर्थातच गैर आहे. तेव्हा लेख पाठविताना ते सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूने लिहून आटोपशीर व थोडक्यात पाठविलेत व पसंत पडण्यापेक्षा ते श्रीसाईलीलेच्या धोरणात जर बसले तर ते लगेच प्रसिद्ध होतील याची खात्री बाळगावी.

आम्ही श्रीबाबांचे भक्तांना आलेले अनुभव तर देतोच पण अन्य साक्षात्कारी संतांच्या संबंधीचे व काहीसे आध्यात्मिक पातळीवरचेही हलके फुलके, जड वाटणार नाहीत असे लेख देत असतो. अध्यात्मावरील काही जड असे साहित्य आमचेकडे येते पण असे साहित्य चांगले असूनही आम्हाला नाकारावे लागते कारण आमच्या वाचकांची बौद्धिक पातळी हे होय. फार जड असे लेख आमच्या वाचकांना पेलवत, वाचवत नाहीत असे गेली पन्नास वर्षे आम्हाला आढळून आले आहे, म्हणून असे साहित्य देण्याचे प्रमाण कमी केलेले आहे. दुसरी गोष्ट लेखमाला सुरू करणे म्हणजे एक प्रकारची भीतीच आम्हाला वाटते.

लेखक लेखमाला सुरू करतात व ती दीर्घकालपर्यंत वाढवत वाढवत राहतात. निश्चित मजकूर कोणत्या अंकापर्यंत संपेल याबद्दल ते काहीच सांगत नाहीत. बरे लेखांकाची पाने कित्येकदा विपुल असतात व हा संपूर्ण लेखांक एकाच अंकात यावा असा आग्रह धरतात. कित्येकदा अशा लेखांकातून अनाठायी असा मजकूर असतो आणि मग अशा वेळेला आमची अवस्था मोठी शोचनीय होते. म्हणून यापुढे निदान श्रीसाईलीलेला मोठे स्वरूप येईतोपर्यंत तरी लेखमाला सुरू करण्याचा आग्रह आमचेकडे कुणी करू नये.

श्रीसाईलीलेत आम्ही सुरू केलेल्या गाठीभेटी या सदराचे अनेकांनी स्वागत केलेले आहे. तसेच श्रीसाई भक्तांची श्रद्धास्थाने हे सदर उपयुक्त व माहितीपूर्ण असल्याचे आम्हाला कित्येकांनी कळविले आहे. श्रीसंतसाईबाबा शिर्डीक्षेत्रीच अजूनही वास करीत आहेत. शिर्डीप्रमाणेच अनेक ठिकाणी ते आपल्या परम भक्तांच्या भेटीला-प्रसंगाला सूक्ष्म देहाने जातात. जिथे जिथे साई मंदिरे आहेत तिथे तिथे बाबा जातातच जातात आणि म्हणून या मंदिरांना आम्ही भक्तांची श्रद्धास्थाने असे म्हणतो. या अशा वंदनीय श्रद्धास्थानांची माहिती देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या कामी मात्र लेखकांनी आम्हाला अवश्य सहाय्य करावे.

श्रीसाईलीलेच्या अंकाचे स्वरूप व आकर्षण वाढविण्याचे यत्न चालूच आहेत. अंतरंगात नवनवीन छोटीछोटी सदरे सुरू करीत आहोत. ही सदरे वाचकांनीच सुचविलेली आहेत. या कामी श्रीसाईलीलेच्या लेखक-कवी वाचक बंधू–भगिनींनी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे व श्रीसाईबाबांचे वाङ्मयीन मासिक जगाच्या कोना-कोपऱ्यात नेऊन पोचवावे, एवढयाचसाठी मी मनमोकळेपणाने व आपुलकीने आज हे संपादकीय लिहिलेले आहे.

# बॅ. शेषराव वानखेडे यांचे अभिनंदन

श्रीसाईबाबा फौंडेशनचे अध्यक्ष, श्रीसाईबाबा संस्थानचे एक निकट हितचिंतक व महाराष्ट्र राज्याचे विधानसभापती बॅ. शेषराव वानखेडे यांची मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी राज्याचे क्रीडा व उद्योग मंत्री म्हणून नेमणूक केली याबद्दल आम्हास अतीव आनंद वाटतो. श्री. वानखेडेसाहेबांच्या या नूतन नेमणुकीबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांना त्यांच्या प्रत्येक आयोजित कार्यात सुयश लाभो अशी शुभेच्छा प्रगट करतो.

# श्रद्धांजलि

श्रीसाईलीला मासिकाचे भूतपूर्व संपादक प्रा. द. दि. परचुरे यांस दि. १–६–७३ ला हृदयविकाराचा तीव्र झटका आला व त्यातच त्यांचा दुःखद अंत झाला. प्रा. परचुरे हे एक थोर साईभक्त होते व प्रस्तुत मासिकाची सुधारणा व त्याचा प्रसार ह्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले होते. श्रीसाईबाबांचे विचार व त्यांची शिकवण ह्यांचा प्रसार करण्याचे उत्तम माध्यम म्हणून ते प्रस्तुत मासिकाकडे पहात असत व त्या दृष्टीनेच त्यांनी ह्या मासिकाचे संपादकीय कार्य चालविले होते. श्रीबाबांचे



कै. डॉ. द. दि. परचुरे

चरित्र व त्यांची शिकवण ह्यांवर आधारित अशा प्रकारची सुश्राव्य कीर्तने ते करीत असत. अशा प्रकारच्या त्यांच्या आठ कीर्तनांचा एक संच शिरडी संस्थानाने प्रकाशितही केला आहे. लहानपणापासून मुलांना साई चरित्राची गोडी लागावी म्हणून त्यांनी "मुलांचे साईबाबा" हे श्रीसाईबाबांचे चरित्र प्रथम सरळ, सोप्या भाषेत, मराठी भाषेत लिहिले. त्यानंतर त्या पुस्तकाचे बऱ्याच अन्य भारतीय भाषांत भाषान्तर झाले आहे. लहान मुलांत ते पुस्तक फारच प्रिय आहे. त्यांच्या चतुर्थ श्राद्धदिनी दि. १ जून ७७ ला आम्ही त्यांना श्रद्धांजलि अर्पण करतो व त्यांच्या आत्म्यास चिरशांति लाभो, अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

—संपादक

आपल्या तरुणपणात श्रीबाबांचे दर्शन घेतलेले

# श्री. सखारामपंत व सौ. सीताबाई दीक्षित

● सदानंद चेंदवणकर



**श्री. सखारामपंत व सौ. सीताबाई दीक्षित**

खारचे रहिवाशी व सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्री. पांडुरंगराव दीक्षित यांचे वडील श्री. सखारामपंत यांचे वय आज ९२ वर्षांचे आहे. त्यांच्या

सुशील व सदा हसमुख अशा पत्नीचे वय आज ८२ वर्षांचे आहे. उभयतांच्या तब्येती आज उत्तम आहेत व त्यांना बोललेले उत्तम समजतेही. विशेषतः सौ. सीताबाई (पूर्वाश्रमीच्या कु. बबुताई कर्णिक) यांच्या डोक्यावरचे केस फारसे पिकलेले देखील नाहीत. या वयातही त्या मोटारींनी गजबजलेला रस्ता अगदी एकस्थ्याने कुणाचीही मदत न घेता सहज ओलांडतात. फक्त वाचतानाच काय तो चष्मा त्यांना लागतो. आपली नित्यनैमित्तिक कामे व देवदर्शन हा त्यांचा दिवसभरचा कार्यक्रम. दीक्षित दांपत्याला तीन पुत्र. थोरले श्री. दत्तात्रय, मधले श्री. पांडुरंग व धाकटे श्री. रघुनाथ. श्री. सखारामपंत दीक्षित या सुखवस्तु, भाग्यवान दांपत्याने शिरडीच्या संतचूडामणि श्रीसाईबाबांचे अगदी डोळे भरून दर्शन घेतलेले आहे. सखारामपंतांच्या पत्नीच्या घरी - कर्णिक - कुलातही साईभक्ती व दीक्षित घराण्यातही साईभक्ती हा एक विलक्षण योगायोग आहे. घरातील उभयता पती–पत्नी साईभक्त असणे एक–अहो भाग्याचे लक्षण समजतात.

सौ. सीताबाईचे माहेर डहाणूचे. १९०८ साली त्यांचा श्री. सखाराम पंतांशी विवाह झाला व त्यानंतर त्या ठाण्याला आल्या. ठाण्याला साईनाथांनी त्यांच्या घरी फकीराच्या वेषात जाऊन त्यांना दर्शन दिले आहे. त्याचे असे झाले. त्यांचे जेष्ठ चिरंजीव श्री. दत्तात्रय उदरात असताना काहीशी नाजुक परिस्थिती निर्माण झाली होती. ती निवारण करण्यासाठी म्हणून बाबा तिथं धावून गेले ! दारी आलेल्या साक्षात् बाबांच्या सारख्याच एका फकिराने त्यांना जवळ बाळगण्यासाठी म्हणून काळा दोरा दिला. धोतराची बोली सीतामाईच्या जवळ केली व पुन्हा सहा महिन्यांनी आपण येऊ असे सांगितले. सुयोग्य समयी बाळ-बाळंतीण अगदी तब्येत सुखरूप. आणि सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे सहा महिन्यांनी बाबा नेमके त्यांच्या-घरी हजर ! त्यांनी छोट्या दत्ताला बघितले शुभाशिष दिले व चटकन अंतर्धान पावले. बोली केलेले धोतरसुद्धा ते घेऊन गेले नाहीत ! पुढे सीतामाईंनी ते शिर्डीला त्यांना नेऊन दिले.

श्री. सखारामपंत दीक्षित, शिर्डीला बाबा असताना बरेचदा जाऊन आले, पण पत्नीसमवेत १९१३ साली गेले. त्यावेळी शिर्डीचा प्रवास आजच्यासारख सुलभ नव्हता. दिवसाकाठी कोपरगावला केव्हातरी थांबणाऱ्या गाडीने उतरून शिर्डीचा प्रवास पुढे टांग्याने करावा लागे. टांग्याचे भाडे अवघे चार आणे होते. तर मुंबईहून कोपरगावचे जाऊन येऊन माणशी भाडे ८ रुपये पडे.

शिर्डीस बाबा भल्या पहाटे उठत असत. ते आपले तोंड स्वच्छ धूत पण तोंड धुताना खूप खोकत व खाकरे काढीत. सकाळी बाबा काहीसे वृद्ध भासत असत. जसजसा सूर्यनारायण वर येई तसतशी बाबांची अंगकांती मोठी तेजःपुंज दिसे, व रात्री ते खूप थकल्यासारखे दिसत. अशा तिन्ही स्वरुपात आम्ही बाबांना पाहिलेले आहे असे दीक्षित दंपती सांगते. बाबा कुणाशीही बोलायचे जरी झाले तरी बोलताना ते कुणाच्याही नजरेला नजर देत नसत हे विशेष होय. बाबांना प्राण्यांची भारी आवड. त्यांच्यापाशी जसा शामसुंदर घोडा होता तशी एक छानशी पांढरी गाय पण होती. बाबांनी मोर पण पाळले होते. त्यांच्या अवती भवती पाच पांढऱ्या चिमण्या नेहमीच असायच्या व त्यांना ते तांदूळ टाकीत. बाबा जसे गेले तशा या पाचीच्या पाच चिमण्या पण कुठे गेल्या कुणास ठाऊक! आरतीच्या वेळेला शामसुंदर बाबांना लवून नमस्काराचा मुजरा करीत असे. बाबा शिर्डी सोडून फारसे कुठेच गेले नाहीत. ते निमगाव, व राहाते या दोनच ठिकाणी गेले. चंद्रभानशेट मारवाडी, नाना डेंगळे, व खुशालशेट हे त्यांचे दाट मित्र होते; व त्यांच्या समाचारासाठी ते त्यांच्याकडे जात-येत. बाबांच्या समकालीन व त्यांच्या अवती-भोवती नेहमी वावरणाऱ्या दीक्षित, बुटी, चांदोरकर, नानावल्ली, बडेबाबा, दासगणू इ. व्यक्तींना आपण जवळून पाहिलेल्याचे श्री. दीक्षित मोठ्या आनंदाने सांगतात. विशेषतः नानावल्ली, रात्रीच्या वेळी स्त्रीवेष घेऊन नाचायचे. बडेबाबा तर चांगले उंच, धिप्पाड व मजबूत बांध्याचे होते. स्वतः बाबा चांगले उंच होते. त्यांचा वर्ण गव्हाळ होता. आजानुबाहू होते ते. त्यांच्या हाताची बोटे लांबसडक होती. ते काहीसे पाय वाकडे टाकून डुलत डुलत चालत. सायंकाळी चार वाजले की ते द्वारकामाईच्या समोर असलेल्या एका झाडाला टेकून तासन् तास उभे राहात. ते मराठी, हिंदी, मुसलमानी, उर्दू बोलत. भक्तांना ते "जाय भाकर तुकडा खाय" अशा बोलीत आग्रह करीत. "अल्ला मालिक तेरा भला करेगा." असे दर्शन घेऊन परतणाऱ्यास ते म्हणत. ते रागावले म्हणजे भयंकर दिसत. त्यांना शांत होण्यासाठी खूप प्रयास करावे लागत. बाबा दररोज पाच घरांना भेटी देत व भिक्षा मागत. बाबांनी आपल्या घरी यावे यासाठी त्यावेळी घरातील गृहिणी दारासमोर छानशी रांगोळी काढून बाबांच्या स्वागतासाठी वाट पहात बसत. बाबा आले की त्यांना अत्यानंद होई. दुपारी बारा वाजता बाबांची आरती होत असे. जोग नावाचे एक भक्त बाबांची मनोभावे आरती करीत. आरतीच्या वेळी घराघरातून नैवेद्य बाबांच्या समोर ठेवला जाई. सगळ्या घरातून नैवेद्य

आला की त्याचा काला करून बाबा प्रसाद म्हणून तो सर्वांना देत. हा प्रसाद कुत्री मांजरे यांना सुद्धा दिला जाई. बाबांनी स्वहस्ते आम्हा उभयतांना प्रसाद दिला आहे इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्या हातांनी आमच्या कपाळाला उदी पण लावलेली आहे, असे सखारामपंत सांगतात. उदीचे महत्त्व आजही आमच्या घरात आहे. कुणीही लहानथोर बाहेर जायचे झाले तरी बाबांना वंदन केल्याशिवाय व उदी लावल्याशिवाय बाहेर मुळीच पडत नाहीत.

बाबा आपले स्वतःचे कपडे स्वतःच सुईने शिवत. आपल्या कफन्या एकावर एक अंथरून ते झोपी जात. बाबांना बागकामाचा छंद होता व त्यावेळी मशिदमाईपासून लेंडी बागेपर्यंत सायलीचा वेल पसरलेला होता. त्या वेलीची एक सुंदर कमान पण केलेली होती व बाबा त्या कमानीमधून जाताना खूप छान दिसत असत. बाबा चालू लागले की त्यांच्यावर भागोजी शिंदे नेहमीच छत्री धरून असायचा. बाबा लहरीत असले की ते चिलीम प्यायला देत. आपल्याला सुद्धा एकदा बाबांची चिलीम प्यायची मोठी भाग्याची संधि लाभली असे श्री. दीक्षित सांगतात. बाबांना कांदा, भाकर, व पिठलं भात झुणका भारी आवडे. आंबा हे त्यांचे आवडते फळ होते. काही भक्त तर शिर्डीला जाताना हापूस आंब्याच्या करंड्याच्या करंड्या नेत. पण बाबा एखाद दुसरा आंबा उष्टावीत व बाकीचे सगळे वाटून टाकीत. बाबा कित्येकदा चावडी पाठीमागच्या श्रीमारुतीच्या देवळात येऊन बसत असत. ज्या भक्तांच्या अंतःकरणात शिर्डीला जाण्याची आत्यंतिक ओढ असेल, त्यालाच बाबा अगदी खेचून शिरडीला आणतात ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे. आम्ही उभयता शिरडीला गेलो तेव्हा आमच्या जवळ अवघे ३३ रुपये होते. त्यापैकी प्रवासाला लागणारे पैसे तेवढे आम्हाला बाबांनी दिले व बाकीचे सर्वच्या सर्व आपल्या जवळ ठेवून घेतले. पण आम्ही अगदी सुखरूपपणे मुंबईला आलो व तेव्हापासून तो आजतागायत आमच्या घराचे अगदी भले झाले आहे. माझी मुले नातवंडे अगदी व्यवस्थित ठीक मार्गावर आहेत. माझा पांडुरंग त्याच्या आईच्या उदरात असताना त्याला बाबांचा स्पर्श झालेला आहे व त्याच्या आईने आपला हा मुलगा कलागुणसंपन्न व्हावा अशी इच्छा बाबांपुढे प्रगट केली होती, ती अक्षरशः फलद्रूप झाली आहे असे दीक्षित दंपती सांगते. आणि मी आज जो कलाक्षेत्रात यशस्वीपणे वावरतो आहे ते केवळ बाबांच्यामुळेच होय असे श्री. पांडुरंगराव दीक्षितांचे आवर्जून भक्तिभावाने सांगणे आहे.

.............

# श्रीसाईबाबांचा प्रसाद

–सौ. अनिता अनंत नाईक
ए–६ बेस्ट क्वार्टर्स, वडाळा डेपोजवळ
वडाळा मुं. ३१

● शिरडीस ज्याचे लागतील पाय ।
टळती अपाय सर्व तयाचे ॥

श्रीसाईबाबांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या अशा पुण्यपावन शिरडीस जाण्याच्या बेतामुळे आम्हां सर्वांची मने उल्हसित झाली होती. आमच्या कुटुंबातील सर्वांचीच तसे म्हटले तर श्रीबाबांवर श्रद्धा आहे. माझे पती श्री. अनंत एकनाथ नाईक ह्यांनी बाबांच्या संगमरवरी मूर्तीची घरी अभिषेक करून स्थापना केली, तेव्हापासून गुरुवारी बाबांची पूजा व रोज संध्याकाळी धूप दाखविणे नियमित चालू आहे.

पण प्रत्यक्ष शिरडीस जाण्याचा योग काही जुळून येत नव्हता. पण ह्यावेळी अगदी आम्हास शिरडीचे दर्शन घडवायचेच असेच बाबांच्या मनात होते. नाहीतर एस. टी. चे पंधरा दिवसांचे सर्व गाड्यांचे रिझर्व्हेशन झाले असता नेमके त्याचवेळी एका इसमाने येऊन गुरुवार २० एप्रिलच्याच तिकिटा आणि त्यापण नेमक्या सहा म्हणजे आम्हाला पाहिजे होत्या तेवढ्याच का परत कराव्या ? आपल्या भक्तांना बाबा त्यांच्या मनात येईल तेव्हा कसे आपल्या चरणाशी ओढून आणतात ह्याचा प्रत्यय आम्हास प्रवासाच्या सुरवातीसच बाबांनी दाखविला.

प्रवासामध्येसुद्धा श्रीसाईबाबांनी आमची कसोटीच पाहिली. गुरुवार २० एप्रिल १९७७ रोजी रात्री १० वाजता निघालेली आमची बस रात्री २ वा. मध्येच बंद पडली व एस. टी. च्या इंजिनमधून नुसत्या वाफा येऊ लागल्या. आम्ही सर्व प्रवासी खाली उतरलो. मी, हे आणि माझ्या सासूबाई व लहान तिघी आमच्या मुली होत्या. ड्रायव्हरने सांगितले की आता दुसरी

बस आणल्याखेरीज पुढचा प्रवास सुरू करणे अशक्य आहे. मला तर त्या रात्रीच्या मिट्ट काळोखात रस्त्यात मुलांना घेऊन रहाणे म्हणजे भितीच वाटत होती. आम्ही सर्वांनी मनातल्या मनात श्रीबाबांची करुणा भाकली आणि त्या गुरुमाऊलीच्या कृपेने लवकरच जवळच्या डेपोतून दुसरी बस येऊन आमचा प्रवास निर्विघ्नपणे झाला. आंघोळ वगैरे करून प्रथम आम्ही समाधी मंदिरात दर्शनास गेलो आणि पतितपावन अशा श्रीसाईबाबांच्या मुखावलोकनाने आमच्या प्रवासाचा क्षीण कुठल्या कुठे नाहीसा झाला. पुढील काव्यपंक्तीत म्हटल्याप्रमाणे शिरडीस एखाद्या क्षेत्राचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

काशी, मथुरा और रामेश्वर । शिरडीमें तीरथ सारे है ।
साईबाबाके चरणोंमें चारों धाम समाये हैं ॥

आम्ही घेतलेली खोली समाधी मंदिराजवळच होती आणि एक कुत्रा आमच्या खोलीत आम्ही असेपर्यंत रोज अगदी न चुकता यायचा. आम्हीसुद्धा मुलांसाठी घेतलेली बिस्किटे वगैरे त्याला देत होतो. पण एकदा हा कुत्रा आमच्या खोलीतून बाहेर जाताना त्याच्या पाठोपाठ माझी धाकटी मुलगी तृप्ती ही त्याची शेपटी पकडायला मजा म्हणून त्याच्या पाठोपाठ धावली. तिला कुत्रा चावेल म्हणून मी पण धावत तिच्या पाठी गेले तर तो कुत्राच कुठे दिसेनासा झाला. आसपास आम्ही पुष्कळ त्याचा शोध केला पण तो काही दिसलाच नाही. फक्त आमच्या दारातून बाहेर पडताना आम्ही त्याला बघत होतो. त्या श्वानरुपात स्वतः बाबाच तर आमचे घरी आले नसतील ना ? कारण बाबांनी नेहमी कुठल्याही रूपात भक्तास दर्शन दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. साकोरीस जाऊन श्री उपासनी महाराजांच्या समाधीचेही दर्शन आम्ही घेतले. साकोरीचे एकंदर शांत निसर्गरम्य वातावरण पाहून कोणालाही तिथेच अनंत-काळ वास्तव्य करावे असे वाटल्याशिवाय रहाणार नाही.

ह्यांची रजा फक्त गुरुवार ते शनिवार तीनच दिवस होती. रविवारी कसेही करून ह्यांना रात्रपाळीला कामावर हजर व्हायचे होते. म्हणून आम्ही शनिवारी साईबाबांचे फोटो, अंगठ्या, प्रसाद वगैरे खरेदी करून ते बाबांच्या पायास लावून घेण्यासाठी देवळात गेलो. जेव्हा बाबांचा फ्रेम केलेला फोटो त्यांच्या पायाशी लावला तेव्हा त्या फोटोवर त्यांच्या पायाकडील एक फूल तसेच त्या फुलासोबत लाह्यांचा प्रसाद पण आला. आपल्या फोटोबरोबरच सद्‌गुरु माऊ-

लीने आम्हाला प्रसादपुष्पही दिले. रविवारची शिरडी ते मुंबई ह्या गाडीची तिकिटे न मिळाल्यामुळे आम्ही ट्रेनने मुंबईस येण्याचे ठरवून शिरडीस एस. टी. स्टँडवर कोपरगावला जाणाऱ्या गाडीसाठी आलो. पण त्या गाडीतही गर्दी होती. कशीबशी आम्हाला उभे राहण्यापुरती जागा मिळाली. गाडी सुटण्यास साधारण पंधरा एक मिनिटे असतानाएक इसम गाडीत चढला. त्याच्या हातात फक्त एका कागदाच्या पुडीशिवाय दुसरे काहीच सामान नव्हते. मी माझ्या धाकट्या मुलीस–तृतीस–खांद्यावर घेऊन एस. टीत गर्दीत चेंगरून उभी होते. एका रिकाम्या जागेकडे जाऊन त्याने आपल्या हातातील पुडी त्या सीटवर ठेवली व माझ्याकडे वळून म्हणाला, 'ताई, ही माझी जागा आहे. मी जरा बाहेर जाऊन येतो तोपर्यंत तुम्ही ह्या जागेवर बसा.' आणि असे सांगून तो माझ्या आभार मानण्याचीही वाट न पाहता आला तसा एस. टी तून उतरून गेला. मी मनोमन देवाचे आभार मानून त्या जागेवर बसले. परंतु एस. टी. सुटली तरी त्याचा पत्ता नव्हता. ह्यांनी स्टँडवर सगळीकडे त्या इसमास शोधला परंतु तो जणू अदृश्यच झाला होता. एस. टी. सुरू झाल्यावर कुतूहल म्हणून आम्ही ती पुडी सोडली आणि आम्ही चकितच झालो. कारण त्या पुडीत पेढे, लाह्या, फुटाणे व उदी असा सर्व अभिषेकाचा प्रसादच होता. आता हा अनुभव खोटा म्हणावा तर त्या इसमास एस. टी. चे तिकिट काढून सुद्धा न येण्याचे कारण काय ? आणि गाडीत इतर सर्व प्रवासी उभे असताना तो नेमका माझ्याकडेच येऊन त्याने मला का बसण्यास सांगावे ?

तात्पर्य म्हणजे भक्तांच्या अगदी लहानसहान अडीअडचणीही श्रीसाईंच्या नजरेतून सुटत नाही. म्हणूनच तर त्यांनी अगदी वेळेवर येऊन मला बसण्याची सोयही केली व आपला प्रसादही दिला.

साईवचनातील ह्या पंक्तीच माझ्या म्हणण्याचे समर्थन करतात.

जो जो मज भजे !
जैसा जैसा भावे ।
तैसा तैसा पावे मीही त्यांसी ।
तुमचा मी भार वाहिन सर्वथा ।
नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥

# युगावतार श्रीसाईबाबा : ९

## ( श्रीसाईबाबा सत्संगमंडळ सुरत, ह्यांच्या सौजन्याने )

अनुवादक :– श्री. चंद्रकांत दामोदर सामंत ताडदेव रोड, मुं. ७

● सद्गुरुंचे भक्तांबरोबरचे संबंध जन्मजन्मांतरीचे असतात. ह्या कारणाने कोणत्या ना कोणत्या निमित्ताने ते आपल्या भक्तांना स्वतःकडे ओढून घेतात; किंबहुना त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यापर्यंत कोणीही भक्त पोहोचू शकत नाही. त्यांचे सामर्थ्य-सुद्धा इतके बलवान असते की आपल्या प्रिय भक्तांना ते स्वप्नाद्वारे दीक्षा देतात व योग्य ते मार्गदर्शनही करतात. ह्या बाबतीतील सुलोचनाबाई काकडे ह्यांचा दृष्टान्त उद्बोधक आहे.

सुरुवातीला त्यांनी श्रीसाईनाथांविषयी काहीही ऐकले वा वाचले नव्हते. तथापि केवळ एका स्वप्नामुळेच त्यांच्या मनात श्रीबाबांविषयी भक्तिभाव निर्माण झाला. वयाच्या सातव्या वर्षी त्या तापाने फार आजारी होत्या. डॉक्टरांचे औषध-पाणी नियमितपणे चालू होते, तरी ताप काही हटत नव्हता. दिवसेदिवस आजार बळावतच चालला होता. मोठमोठ्या डॉक्टरवैद्यांनीही हात टेकले होते.

अशा परिस्थितीत एके दिवशी सकाळी तिच्या वडिलांचे एक मद्रासी मित्र त्यांना भेटावयास घरी आले. ते सदैव स्वतःजवळ श्रीसाईबाबांचा फोटो व उदी बाळगीत असत. आपल्या मित्राच्या मुलीचा आजार कमी न होता वाढतच आहे हे ऐकून त्यांनी सुलोचनाच्या वडिलांना श्रीबाबांचा एक फोटो दिला व थोडी उदीही दिली. तो फोटो तिच्या वडिलांनी तिच्या अंगाला तीनदा लावला व तिच्या गळयाला आणि डोक्याला उदी चोळली. थोड्याच वेळात तिला गाढ झोप लागली.

त्याच रात्री सुलोचनाच्या स्वप्नात श्रीबाबा आले व त्यांनी तिला आशीर्वाद दिला. स्वप्नात तिला समुद्रकिनारी एक भव्य देऊळ दिसले. चंद्रप्रकाशात देवळाची शोभा अवर्णनीय दिसत होती. आतील नक्षीकाम तर अप्रतिम होते. आत सुमारे दोनशे पायऱ्या उतरून मंदिराच्या तळाशी पोहोचल्यावर तिला तेथे श्रीबाबा बसलेले दिसले. तिला पाहताच त्यांनी, 'ये बाळ' असे प्रेमाने म्हटले. त्यांचा पोशाख तिला

फारच साधा वाटला. डोक्यावर फडके व अंगावर कफनी ! तिने त्यांना विचारले, "बाबा, तुम्ही हा असला वेष का धारण करता ?" त्यावर ते उतरले, माझ्या कित्येक बाळांना नेसावयास वस्त्र नसताना व जेवावयास पोटभर अन्न मिळत नसताना मला चांगले कपडे व चांगले अन्न कसे बरे सेवन करता येईल ?" एवढे बोलून त्यांनी तिला तीर्थ दिले व "बेटा, सुखी रहा" असा आशीर्वाद दिला. डोळे मिटल्या मिटल्याच सुलोचनाने त्यांना प्रणिपात केला. त्या दिवशी पडलेल्या स्वप्नानंतर तिची प्रकृती हळुहळू सुधारली व ती नित्यनेमाने श्रीबाबांची भक्ति करू लागली.

..............

# भक्तांची काळजी बाबांना

–सौ. सरला सू. गर्जे, शिवाजीनगर, पुणे ५

दसऱ्याचा दिवस. शिवाजीनगर पुणे–५ मधील साईबाबांचे मंदिरात भक्तांची अलोट गर्दी झालेली होती. कारण बाबांचे मंदिरात दसऱ्याचा उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. मंदिरासभोवार भव्य शामियाना उभारण्यात आला होता. मंदिर लहान, मोठया, वृद्ध भक्तगणांनी फुलून निघाले होते. विद्युत दिव्यांच्या रोषणाईचा झगझगाट, उदबत्त्यांचा घमघमाट शिवाय रंगीबेरंगी रांगोळयांचा थाट; वातावरण कसे मंगलमय अन् प्रसन्न वाटत होते.

बाबांच्या संगमरवरी मूर्तिला दह्या–दुधाचा अभिषेक करण्यात आला. नंतर मखमली पेहराव करण्यात आला. कपाळी केशरी गंध लावण्यात आला. सुवर्णमुगूट चढविण्यात आला. बाबांचा चेहरा किती प्रसन्न वाटत होता. किती तेजस्वी अन् ओजस्वी वाटत होता. चेहऱ्यावर स्मित झळकत होते.

पेटी वादनाच्या तालावर मधुर स्वरात आरती म्हणण्यात आली. त्या नंतर प्रसाद वाटपाचा कार्यक्रम झाला व सर्व मंडळी आपापल्या घरी गेली.

येथील साईदास मंडळाचा असा प्रघात आहे की, दसऱ्याच्या दिवशी सर्वांनी आपापले घरचे डबे आणावयाचे, नंतर सर्व डबे एकत्र करून साईबाबांच्या सान्निध्यात सहभोजनाचा लाभ घ्यायचा. त्याप्रमाणे मी देखील गोड प्रसादाचा स्वयंपाक केला; व डबा भरून मंदिरात नेला.

नित्याप्रमाणे सर्व डबे एकत्र करण्यात आले. पंगती पडल्या. मी व माझी मैत्रीण आम्ही दोघीजणी मिळून सर्वांना वाढू लागलो. दुपारी दोनचा सुमार म्हणजे भुकेची वेळ. त्यामुळे सर्वांनी भोजनावर ताव मारला. अखेरीस सर्व डबे फस्त झाले. व घासभर भात भांड्यात शिल्लक राहिला. पंगत उठल्यानंतर आम्ही दोघींनी तो घासभर भात बाबांचा प्रसाद म्हणून खाऊन घेतला व आवराआवर केली. भूक तर खूपच लागली होती. म्हणून घरी जाऊन थोडे फार काहीतरी करून खावे असा विचार करून साईबाबांना प्रदक्षिणा घातली, पादुकांचे दर्शन घेतले व मागे वळून पाहते तर काय आश्चर्य! मंडळातील एका भक्ताचा डबा काही कारणामुळे येण्यास उशीर झाला व त्यांची मुलगी तो गरम गरम डबा घेऊन माझ्या पुढे उभी! सर्वांच्या आग्रहास्तव आम्ही दोघींनी पुन्हा तो डबा घेऊन जेवणास आरंभ केला. गरम गरम पुरणपोळी, भात, आमटी, भजी, अशा सुग्रास अन्नावर ताव मारीत व मनोमन साईबाबांचे नामस्मरण करीत भोजन आटोपले.

पंगतीतील सर्व अन्न संपत यावे व अशा भुकेच्या वेळी मिष्टान्नाचा गरम डबा वेळेवर हजर व्हावा ही साईमाऊलीचीच कृपा म्हणावी. भक्तांची काळजी बाबा कशी दूर करतात हे आठवून डोळे आनंदाश्रूंनी भरुन आले.

# मन! मन! मन!!

– सौ. आशा दयानंद इंगळे
जलमंदिर सोसायटी, भांगूरनगर, गोरेगाव मुं. ६३

● मन ही एक संपन्न आणि सुपीक भूमि आहे. प्रत्येक सजीव प्राणीमात्राचे ठिकाणी मन ही संज्ञा असलेला अदृष्य स्वरुपाचा एक विशिष्ट कप्पा असतो. ह्या

मनाद्वारे आपणास सर्व तऱ्हेच्या भावना जाणता येतात. सुख, दुःख, हर्ष, शोक, चिंता हे सर्व ह्या मनाचेच विकार आहेत. म्हणूनच एखादा दुःखातिरेकाचा प्रसंग पाहून आपले 'मन हळहळले' किंवा आनंदातिशयाने 'मन सुखावले' असे आपण व्यवहारात बोलतो. ही झाली ह्या मनाची स्थिती.

तसेच आपल्या अवती भवती जर संगत चांगली असेल तर वाईट मनोवृत्तीचा प्राणीही सत्संगामुळे सज्जन बनतो. पण संगत जर वाईट असेल तर चांगला प्राणीही बिघडायला वेळ लागत नाही.

मूल जन्मास येतं तेव्हा ते अगदी निष्पाप व निरागस असतं. ते जसंजसं मोठं होऊ लागतं, तसतसे त्याच्यावर जसजसे संस्कार घडले जातात अर्थातच बालकाच्या मनाची घडणही तशीच होत जाते. म्हणजेच मन हा एक ओल्या मातीचा गोळा आहे. आपण त्यास जसे घडवू तसा त्यास आकार येतो. म्हणजेच ही मनोभूमि मुळातच मऊ आहे तशीच ती सुपीक आहे. मात्र आपण त्या भूमिवर चांगले धान्य पिकवीत नाही. कारण त्यात असलेल्या शुद्ध बीजाची आपण दखल घेत नाही. म्हणूनच ह्या सतेज बीजाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. हे बीज जन्मतःच सजीव प्राणीमात्रांचे ठायी अदृष्य स्वरुपात सूक्ष्मपणे पेरलेले असते.

शेतकरी जसे आपल्या जमिनीत योग्य खताची योजना करून बी पेरतो व जास्तीत जास्त पीक येण्याची धडपड करतो; अर्थात तसेच आपणास ह्या मनोभूमित शुद्ध, सात्विक विचारांचे खत घालून पारमार्थिक बीजाची वाढ केली पाहिजे. म्हणजेच बौद्धिक उन्नति साधली पाहिजे. ह्या मनोभूमित कोणतेही पीक (संस्कार) लगेच मूळ धरतात व वाढीस लागतात. म्हणून इतर (इतरेतर वाईट गोष्टींची) पिकांची लागवड करून तिला निकस बनविण्यापेक्षा उपजतच पेरलेल्या पारमार्थीक सतेज बीजाची योग्य जोपासना करून शुद्ध चैतन्याची लागवड करावी व तीस अधिकाधिक सुपीक बनवावे म्हणजे ते निश्चितच आपल्या आत्महिताचे ठरेल. कारण 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षये' म्हणूनच श्रीसमर्थ रामदास स्वामीनीहि मोठया प्रेमळपणे ह्या मनाला आर्जविलं आहे की,

'मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।
तरि श्रीहरि पाविजे तो स्वभावे ।।

ईश चिंतनाच्या नवविधा भक्तिपैकी अगदी सुलभ व सोपी भक्ती म्हणजे भगवंताचे नामस्मरण होय. अर्थात व्यक्ति तितक्या प्रकृति ह्या उक्तिप्रमाणे प्रत्येकाचे

आराध्य दैवत वेगवेगळे असते पण आराधना मात्र एकाच प्रकारची असते. जसे शिर्डीला जाताना कोणी बसने जातो तर कोणी आगगाडीने, तर कोणी धनिक स्वतःच्या मोटार गाडीने. पण सर्वांची भावना मात्र एकच. साईदर्शन. तद्वत भक्ति कशा प्रकारेही करावी मात्र हेतू एकच. आत्मोन्नति. ईशसेवा. त्यातल्या त्यात नामस्मरण हा भक्तीचा उत्तम मार्ग आहे. अशा ह्या नामस्मरणामुळे अति दुरतिक्रम असा संसाराचा महासागर अगदी सहज तरुन जाता येतो. कारण ह्या मनोभूमीत पेरलेल्या सतेज पारमार्थिक बीजावर नामस्मरणाची संतत पर्जन्यधार बरसल्यामुळे मन अधिकाधिक सर्वांग सुंदर व संपन्न बनते. त्यामुळे पारमार्थिक बीजाची वाढ झपाट्याने होऊ लागते. आणि हळूहळू बीजाला अंकूर, अंकुराचे रोप व रोपाचे ताट आणि ताटांना ज्ञानभक्तीची मधुर कणसं लगडतात. मात्र बीज पेरल्यापासूनच शेतकऱ्यास किटाणू किंवा अन्य पाखरे ह्यापासून उपद्रव होऊन पिकांची नासधूस होऊ नये म्हणून जंतुनाशक फवारे व गोफण इत्यादींचा उपयोग करून घेणे भाग पडते. त्याचप्रमाणे साधकास किटाणू ( काम-क्रोधादि षड्रिपू ) पासून सावध रहावयास हवे. माया-मोहासारख्या पाखरांस मोठ्या अदबीनं हाकून लावलं पाहिजे. तरच आपली ज्ञानभक्तीची मधुर कणसं शाबूत रहातील. मग ही कणसं सर्वांना मनसोक्त वाटत सुटायचे आणि अपार आनंद लुटायचा. मग कसलेहि सुख वा दुःख जाणवत नाही. कारण सगळीकडे एकच ब्रम्हानंद प्रकटला आहे असे वाटते. असे वाटणे म्हणजेच साधकाचे मन सर्वतोपरी ईशभक्तीने परिपक्व होणे. मग मन सुखाने मोहरून जात नाही की दुःखाने विकल होत नाही. म्हणजेच साधक हा नुसता नामधारी साधक न रहाता तो निष्काम साधक बनतो. आणि म्हणूनच कोणत्याही कठीण प्रसंगी तो ( साधक ), मुळीच डगमगत नाही. भीत नाही. कारण मन निर्भय झालेले असते. ह्याच करिता आपणसुद्धा आपल्या प्रांजल मनाला अगदी निक्षून सांगूया की 'बा मना ! आता तरी प्रपंचाचे सर्व ऊहापोह सोडून डोळसपणे आत्महिताची कास धर. अन् मला परमार्थाच्या उंच शिखरावर घेऊन चल, की जेथे साई...साई...साई...साई इतकेच स्वर ऐकू येतील आणि साई साई म्हणत मी साईरूप होईन.' इति ॥

.............

# श्रीसाईबाबाय नमः

– डॉ. श्यामसुंदर शंकर तेंडुलकर
नवा ७१० सदाशिव पेठ, पुणे ३०,

● 'नदीचे मूळ आणि ऋषिंचे कूळ पाहू नये' असे म्हणतात यातील रहस्य हेच आहे. दैवयोगाने किंवा स्वकर्तृत्वाने एखादी व्यक्ति प्रसिद्धीस आली की तिच्या जन्माविषयी अनेक अतिरंजित आख्यायिका रूढ होतात. विचारी माणसांनी त्यांचे जन्मरहस्य उकलण्याचा खटाटोप न करता त्यांची कृपा लाभून आपली स्वतःची आत्मिक उन्नती कशी होईल याचीच काळजी घेणे श्रेयस्कर असते.

एकाच कुटुंबातील तीन पिढ्यातील संत म्हणून ख्यातनाम पावलेल्या तीन व्यक्तींचा परिचय गेल्या पंचेचाळीस वर्षात मला लाभला त्या प्रत्येकाचा अगदी सलगीने परिचय, सहवासाचा अनुभव, त्यांच्याविषयी प्रसिद्ध अप्रसिद्ध आख्यायिका; तसेच त्या प्रत्येकाच्या जीवनक्रमाची व वागण्याची पद्धति यांत मला पुष्कळच तफावत दिसून आली. पहिल्या पिढीतील विभूती जितकी मला आकर्षून घेऊ शकली तो प्रत्यय अद्यापि पुढील दोन पिढीतील व्यक्तीत दिसून येत नाही.

चाळीस वर्षापूर्वी माझ्या ऐकण्यात आलेली श्रीसाईबाबांची एक गोष्ट चमत्काराविषयी बोलकी व उद्‌बोधक ठरेल !

कुशाभाऊ म्हणून एक गृहस्थ होते. त्यांना चमत्कार करण्याची सिद्धि प्राप्त झालेली होती. आगगाडी थांबविणे, पेढे वाटणे इ. चमत्कार करण्याविषयी त्यांची ख्याति होती. एकदा ते शिरडीस गेले. बाहेर बसल्या बसल्याच चमत्कार करून त्यांनी तेथील मंडळींना चकित केले. त्यांच्याकरता दर्शनाची परवानगी मागण्यासाठी माधवराव देशपांडे बाबांकडे गेले व म्हणाले "एक महान योगी आपले दर्शन घेऊ इच्छितात !" ऐकताच बाबा उत्तरले, "त्या साल्याला म्हणावे आधी त्या रांडेला सोड व मग माझ्या दर्शनास ये !" हे ऐकताच सर्वांना आश्चर्य वाटले. कारण बाबा असत्य बोलणे शक्य नाही, आणि हे गृहस्थ दिसतात तर सभ्य ! अखेर कुशाभाऊना बाबांचा निरोप त्यांनी कळविला ! कुशाभाऊ म्हणाले "बाबांना म्हणावं तुम्हीच तिच्या पाशातून मला सोडवा" असे म्हणून ते बाबांच्या दर्शनास गेले. त्यावेळी

बाबांनी सिद्धिच्या मोह कसा अधःपात घडवितो व त्या व्यक्तीचा अंतही खेद-जनक कसा होतो हे त्यांना समजावून पटविले. दुर्दैवाने बाबांचा उपदेश बाबांपाशी राहिला; कुशाभाऊंना सिद्धिचा मोह सुटला नाही, आणि माझ्या माहितीप्रमाणे त्यांचा अंतही खेदजनक झाला.

त्यांच्या चमत्कार करण्याबद्दल विचारता स्वतः कुशाभाऊ स्पष्ट सांगत की, मी नव्याने कोणतीही वस्तु निर्माण करीत नाही किंवा जवळ बाळगीतही नाही. मला ती दुसरीकडून उचलेगिरी करून आणवावी लागते व ते काम मला लाभलेली शक्ति गुप्तपणे करते!

त्याच कुशाभाऊंशी गप्पा मारताना बाबा म्हणाले, "बामणा, जेवलास का?" भाऊ– "बाबा आज एकादशी, उपवास." "मग काय खातोस?" "फळे!" बाबांनी कांदे पुढे केले. भाऊ "कांदा निषिद्ध आहे. उपवासाला खात नाहीत." बाबा "बामणा कांदा फळ नाही का? तू आताच म्हणालास ना फळे खातो म्हणून!" "बाबा तुम्ही खाल तर मी खाईन!" "बघ बरं बामणा!" असे म्हणून बाबांनी स्वतः कांदा खाल्ला! कुशाभाऊनी पण मग खाल्ला. लगेच बाबा म्हणाले, "साला बामण म्हणवितो. आणि एकादशीला कांदा खातो!" "बाबा तुम्ही खाल्ला म्हणून मी खाल्ला" "अरे बामणा, खरे तरी बोल! मी कांदा खाल्ला म्हणतोस? बघ!" असे म्हणून ठसका देऊन बाबांनीं पोटातील अन्न बाहेर काढले आणि काय आश्चर्य पोटातून निघाले उकडलेले बटाटे!

आरंभी सिद्धिचा उपहास केलेल्या बाबांनी हा पण चमत्कार स्वतः करून हेच दाखविले की ब्रह्मवेत्त्याखेरीज इतरांना कांदा बटाट्याविषयी अभेद दृष्टी प्राप्त होत नाही!" बाबा ब्रह्मवेत्ते होते. कुशाभाऊ नव्हते! हाच यातील मतितार्थ!

नवनाथात रेवणनाथांना महिमा सिद्धि प्राप्त झाली होती. पण दत्ताच्या कृपेने ब्रह्मवेत्ता होईपर्यंत त्यांना मच्छिंद्रनाथाप्रमाणे अभेद दृष्टि लाभली नाही.

श्रीबाबांचे समकालीन व परिचित संत श्री माधवनाथ महाराज यांनी ब्रह्म-वेत्त्या संतांच्या चमत्काराबाबत फार सुंदर विवेचन केले आहे.

" कुंडलिनी होता अस्थिर। करील अतर्क्य प्रकार। त्यास जन म्हणती चमत्कार। परि ते चमत्कार नव्हती ॥ तो योगींद्र घेईल दुजांचा आजार। विभूतिने करील दुःख दूर पाहील सर्वांचे अंतर। परि तो चमत्कार नव्हे॥ तो पृथ्वीमाजी संचार। होईल अंतरीचा सूत्रधार। पाळील भक्तांचा भार। तो चमत्कार नव्हे॥ विजेची ज्योत

शहरात। पाहिल एक खेडवळ खचित। तेलबत्तीवीण दिसतां प्रदीत। म्हणे त्या चमत्कार॥ तैसा अनभ्यस्ता वाटेल चमत्कार। परि तो योग्याचा विहार। तू मोहू नको चमत्कार। म्हणोनियां॥ (श्री माधवनाथ: दीपप्रकाश किरण २१ ओ. ११७–२१)

श्रीसाईबाबांनी हयातभर अगणित चमत्कार केले. पण ते शिरडीत राहूनच! क्वचित जवळच रहात्यास काही काळ ते गेल्याचे त्यांच्या चरित्रात आहे. पण चमत्काराच्या किंवा सत्काराच्या प्रदर्शनार्थ ते कोठेही मिरवले नाहीत. किंवा त्यांनी ऐषआरामही कधी केला नाही. तसेच घड्याळे, सोन्याच्या अंगठ्या, स्फटिकाची जपमाळ अशा मौल्यवान जिनसाही साईबाबांनी कधी काढलेल्या ऐकिवात नाहीत. त्यांनी चमत्कार केले ते हातोहात भक्तांस आपल्याकडे आकर्षून आत्मोन्नतीस लावण्यासाठी! मला तर श्रीसाईसच्चरितातील त्यांचा प्रत्येक चमत्कार भगवद्गीतेतील तत्वज्ञानाचा बोध करून देता झाला.

शिरडी हेच बाबांचे जागृतस्थान आणि भक्तांचे श्रद्धास्थान आहे!


—श्रीसाईलीला—

जगातील सर्वात स्वस्त सचित्र मासिक

वर्षभर श्रीसाई साहित्याचा आपल्या घरात सुगंध पसरवा

वर्षातून पाच खास अंक

वा. वर्गणी ६ रु. [ट. ह. सह] किं. ६० पैसे

# कर्मयोग

—श्री. पांडुरंग भुजबळ, सातारा.

● मानवी जीवन हे निरनिराळ्या योगाने युक्त आहे. प्रत्येक व्यक्तीला योग असतो. त्याप्रमाणे कर्मयोग हा सर्वच व्यक्तीला त्याचे पाठीमागेच लागलेला असतो. त्याशिवाय त्याचा तरणोपाय नाही. कर्मयोग नाहीतर मानव नाही. मग ती स्त्री, पुरुष अगर बालक असो कोणाही व्यक्तीस कर्मयोग चुकला नाही. इतर सर्व कृत्ये व योग टाळता येतील पण कर्मयोग कोणासही टाळता येणार नाही. कोणत्याही दर्जाचा मनुष्य असो त्याला कर्मयोग प्राप्तच आहे. मग तो श्रीमंत असो अगर गरीब असो. मानवी जीवनात जे कर्मयोगी नाहीत, ते आळशी समजले जातात. कोणताही सत्पुरुष हा कधींच कर्मयोग सोडून वागत नाही. खरा सत्पुरुष कर्मयोगाची कास धरण्यास शिकवीत असतो. परंतु भोंदू व समाजाला फसविणारे योगी ह्या जगात दिवसेदिवस वाढत चालले आहेत. अंगावर भगवी वस्त्रे परिधान करावयाची, कपाळी गंधाचे भव्य टिळे लावावयाचे व गळ्यात माळा घालून सर्वत्र संचार करीत फिरावयाचे व लोकांना खोटे नाटे सांगून त्यांची फसवणूक करावयाची असा त्यांचा उद्योग चाललेला असतो, व सुशिक्षित समाज व अगदी पुढारलेलाही समाजही ह्या लोकांना फसून आपला नाश ओढून घेतात. ह्या लोकांना परमेश्वराची कृपा अगदी सहज विनात्रास प्राप्त करून घ्यावयाची असते. ह्याचा हे लोक अवश्य फायदा घेतात. हे भोंदू योगी लोक कोणताही धंदा न करता व अशा पुढारलेल्या लोकांचे जीवन उध्वस्त तर करतातच व आपणही आळशी बनतात व समाजही त्यांना आळशी बनवतो. ज्याचा आत्मा ब्रम्हाशीं एकरूप झाला आहे व त्याला प्राप्त झालेली शक्ती शब्दातीत आहे अशा सत्पुरुषाला कोणताही पोषाख व गंध वगैरे काहीही नाटक करायला लागत नाही. तो आपण स्वतः कृती करतो व त्याचप्रमाणे दुसऱ्यालाही करणे भाग पाडतो. सध्याचे कलियुगात साधुंचा दुष्काळ झाला आहे. कोणालाही कर्म करावयास नको आहे. अशी अवस्था निर्माण झाली आहे. प्रत्येकाने देवाची व परमेश्वराची पुजाच करावयास पाहिजे असे काही नाही. आपल्या कर्माने आपल्या वाटणीस जे कार्य आले आहे ते निःस्वार्थीपणाने व शिस्तीने केले पाहिजे. हीच ईश्वर सेवा. श्रीसद्‌गुरू साईबाबा म्हणतात—कर्तव्य हाच परमेश्वर व आपले

नित्य नेमलेले काम करणे हीच ईश्वराची पूजा. असा त्यांचा संदेश तो त्यांनी आपल्या हयातीत अमलात आणला आहे, व सर्वांना त्या मार्गाने जाणे भाग पाडले आहे व त्यांनी आपले स्वतःचे जीवन कर्मयोगाने युक्त असे नटवले होते. प्रथम कार्य मग उक्ती. हाच कान मंत्र त्यांनी आपल्या भक्तांना दिला. आज सर्वत्र काम कमी व मोबदला जास्त अशी वृत्ती सर्वत्र फैलावली आहे. संतांची शिकवण धूळ खात पडत चालली आहे. प्रत्येक जण आपल्या मताप्रमाणे वागत आहे. त्यामुळे अंदाधुंदी माजत चालली आहे. कामाचा उरक नाही, उत्पादन घटत चालले आहे, व अनाचार प्रत्येकात वाढत चालला आहे. ह्याला एकच कारण, संतांची शिकवण त्यांचे पोथीत राहिली आहे. नुसती जाहीर पारायणे करावयाचे पण त्यात संतांनी सांगितलेले तत्त्व कोणीही आचरणात आणीत नाही. नुसते भक्तीचे प्रदर्शन करावयाचे व आपल्या अंगातील सुप्त शक्तीला योग्य ते वळण द्यावयाचे नाही. तर मग पारायणांची काय जरूरी? श्रीसाईबाबांनी आपल्या कृत्यांनी सर्व जनतेला दिपवून टाकले. कारण त्यांचे आचरण त्याप्रकारचे होते. कर्मयोग ही महानशक्ती आहे, व ते आपल्या आयुष्याचे शक्तिपीठ आहे. त्याचा सत्याने पाठपुरावा शिस्तीने केला तर ह्या जगात काही कमी पडणार नाही. कशाचीही उणीव भासणार नाही. तुमचे नशीब तुमचा कर्मयोग घडवितो. ते परमेश्वर घडवीत नाही. सदाचार, श्रद्धा व तळमळ ठेवून दिलेले कर्म करा. परमेश्वर तुमचे पाठीशी उभाच आहे. परमेश्वर तुमच्या हृदयात आहे. तो जर जागृत करावयाचा असेल व तुम्हाला त्याचे दर्शन व मार्गदर्शन पाहिजे असेल तर कर्तव्य कर्म नेमाने करा. नुसता बाह्य देखावा नको आहे.

काही दिवसापूर्वी एका वर्तमानपत्रात वाचले की " तीन दिवसात ७५ कार्यक्रम पार पाडले." ह्याला काम म्हणावयाचे, हा कर्मयोग नाही. तर दिलेले काम सोडून इतर अवांतर कामे करणे म्हणजे तो कर्मयोग नाही. हे कर्म योगाचे बाहेरचे कार्यक्रम म्हणजे आपल्या कर्तव्यात आपणच उणीवा निर्माण करावयाच्या व त्यामुळे कोणतेही काम शिस्तीत होत नाही, व मानसिक त्रास व शक्तीचा व्यय होतो, व राष्ट्राची शक्ती क्षीण होते. एखाद्या पुढाऱ्याचे भोवती जरूर नसलेले अधिकारी व पुढारी पुढे पुढे करतात. हा काही कर्मयोग होत नाही. तो लुडबुडेपणा होतो. व त्यामुळे स्वतःची व राष्ट्राची हानी तर होतेच व कार्यभागही साध्य होत नाही. ह्याबाबत वरिष्ठ अधिकारावर असलेल्या एका व्यक्तीने अगदी जाहीर कानउघाडणी केली होती. पण त्याचा सध्यातरी उपयोग झाला नाही असे दिसते. ही प्रथा बंद पडली पाहिजे असे वाटते.

कर्म केल्याखेरीज भक्तीचा लाभ होत नसतो. ईश्वराचे दर्शन होत नसते. ध्यान जप वगैरे म्हणजेच कर्म. त्याचे नामगुण संकीर्तनदेखील कर्म, परत दान, यज्ञ हे

सगळेही कर्म होय. कोणतेही कर्म करा. जे फलाकांक्षेचा त्याग करून कामना शून्य होऊन करू शकल्यास ईश्वराशी योग साधत असतो. यासाठी कर्मयोग फार उच्च व श्रेष्ठ होय. आळशी बनाल तर फुकट जाल. परमार्थात दैवाचं नावसुद्धा काढू नका. धडाडीने पौरुष प्रयत्न करा. जगाशी वर्तणूक नीतीची पण तडफेची असावी, नेभळट-पणा किंवा शेळपटपणा हा स्वार्थ परमार्थ आणि कर्मयोग यांना कमीपणा आणणारा आहे. दैन्यवाणे असणं हे काही वैराग्य नव्हे किंवा आळशी बनणे हे काही नैष्कर्म्य नव्हे.

ज्याची कर्मयोगावर दृढ श्रद्धा असेल त्याचे काम तावडतोब होते. म्हणून सत्कर्म करीत असताना जिकडे जिकडे मन जाईल तिकडे तिकडे त्या सत्कर्मांचा परिणाम घडून ती ती स्थळं पवित्र होत जातात. कर्मानुसार फळ मिळालंच पाहिजे असा सिद्धांत आहे. कर्म हे मनुष्याच्या हातचं आहे. माणसाचे दैव हे त्याच्या कर्मानुसारच ठरते. माणूस हा स्वतः आपल्या कर्मांचा नियंता आहे. कर्म करणं आणि दैव ठरवणं हे आपल्या हातीच आहे. आपल्या कर्मानुसार मिळणारे सुख दुःख हे आपणच निर्माण करीत असतो.

**म्हणूनच कर्मयोग श्रेष्ठ आहे.**

...............


# श्रीसाईलीला

## सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७७

श्रीसाई भक्तांना आलेल्या बाबांच्या विषयींच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार.

श्रीसाईभक्तांनी आपापले अनुभव कागदाच्या एकाच बाजूवर सुवाच्य लिहून ते ३० सप्टेंबर ७७ पर्यंत संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४बी डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

**मुखपृष्ठावर बाबांचे उत्कृष्ट चित्र** **किंमत सव्वा रुपया**

# "श्रीसाईबाबांचे साक्षात मीलन .... आशीर्वाद.... पण ! ओळख नव्हती"

– शंकर बाळकृष्ण नानोटी

संगीत विशारद ( उपांत्य ) हनुमान रोड, सिताबर्डी, नागपूर

● मी १९–२० वर्षांचा असेन. मला त्या वेळेस श्रीसाईबाबांबद्दल काहीच माहिती नव्हती. मी १९५१ सालची गोष्ट सांगतो आहे. मी ११ वी मॅट्रिकला होतो व माझी धाकटी बहीण शकुंतला ८ वी मध्ये होती. मी मॅट्रिकच्या परिक्षेला बसलो परंतु मला यश आले नाही. घरी वडील बंधू पदवीधर आहेत व मी अगदी थोड्या गुणांनी मॅट्रिक नापास झालो. मनाला खूप वाईट वाटले. विचार केला पुरवणी परीक्षेला बसू. फिरून अभ्यास चालू झाला. या अवधीमध्ये माझ्या मोठ्या वहिनीचा मामेभाऊ अचानक घरी आला. मी त्याला म्हटले, काय मधुकरराव, माझ्याकरिता तुमच्या प्रेसमध्ये काही जागा आहे का ? हे मधुकरराव त्या वेळेस गव्हर्मेंट प्रेसमध्ये कंपोझिटरचे काम करीत होते. त्यांनी मला दुसऱ्या दिवशी प्रेस-मधे बोलाविले व अॅप्रेंटीस म्हणून कामाला लावले. रोज मला सकाळी १० ते सायंकाळी ५–३० वाजेपावेतो काम करावे लागे. त्यामुळे अभ्यास होत नव्हता. धाकटी बहीण शकुंतला ११ वीला आली. आता वडील म्हणू लागले अरे, शंकर आता तरी मॅट्रिक हो. तुझी धाकटी बहीण तुझ्या बरोबर आली आहे. आता दोघंही अभ्यास करा व पास व्हा. मनाचा पक्का विचार केला व खूप अभ्यास करू लागलो इतका की ऑफिसच्या मधल्या वेळच्या सुटीतदेखील. परंतु आमचे जे फोरमन श्री. कांतम होते त्यांना मी मॅट्रिक व्हावे असे वाटत नव्हते. ते सारखे मला म्हणत की २ वर्षामधे अभ्यास सगळा बदलला आहे, तुम्ही काही पास होऊ शकत नाही. झाले, एकदाची परीक्षा जवळ आली. मी परीक्षा दिली. माझे सर्व पेपर चांगले गेले होते परंतु इंग्रजीचा १ ला पेपर खूपच रद्दी गेला होता. पेपर सोडवून घरी आलो व रडू लागलो. सगळ्यांनी विचारले काय झाले. मी त्यांना सांगितले पेपर एकदम खराब गेला, मी काही पास होऊ शकत नाही. संध्याकाळ झाली. वडील म्हणाले, शंकर बाजारात जाऊन भाजी घेऊन ये. मी पिशव्या घेऊन बाजारात गेलो. कशीबशी एकदाची

भाजी घेतली व पिशव्या घेऊन तेथील पुलावर विचार करत बसलो की आता आपले कसे होणार, आपला इंग्रजीचा १ लाच पेपर बिघडला, म्हणजे आपण आता पुन्हा नापास होणार! या मनःस्थितीत असतानाच एक कफनीधारी मनुष्य आला व माझ्या पाठीमागून माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला की, "काय विचार करतोस?" मी त्याला सर्व हकीकत सांगितली. तो गृहस्थ देखील माझ्याच बाजूला पुलावर बसला व मला म्हणाला की, "अरे काही घाबरू नकोस, सगळे काही ठीक होईल. तू असं कर घरी जाताना साईबाबांचा फोटो विकत घे व त्यांच्या स्तोत्राचे पुस्तक देखील घे व सकाळ–संध्याकाळ फोटोला नमस्कार करायचा, स्तोत्र वाचायचे व उदबत्ती लावून त्याचा अंगारा प्रथम फोटोला लावायचा व नंतर कपाळाला. जा घरी, सर्व ठीक होईल." मी त्याप्रमाणे केले. खूप जप केला. मी प्रेसमधे असताना आमच्या फोरमनला वाटायचे की हा काही पास होणार नाही. म्हणून त्याने निकालाचे आदले दिवशी तेथीलच एका कामगाराला "महाराष्ट्र दैनिक वर्तमान पत्र" या प्रेसमध्ये माझा परीक्षाक्रमांक देऊन पाठविले व पास की नापास बघून यावयास सांगितले. तो मनुष्य माझा निकाल आणावयास गेला. इकडे माझे डोळे सेक्शन मध्ये लावलेल्या श्रीसाईबाबांच्या फोटोकडे लागले व डोळयातून अश्रू आले. म्हटले, देवा आता तुम्हीच मला वाचवा. तो निकाल आणावयास गेलेला माणूस परत आला व फोरमनपाशी जाऊन म्हणाला की, साहेब, या क्रमांकाचा मुलगा "पास डिव्हीजन" मध्ये पास झाला आहे. झाले, त्या फोरमनचे तोंड एकदम उतरले. तो मला म्हणाला की, नानोटी बाबू पेढे निकालो. मी म्हटले की उद्या निकाल आहे. मी सकाळी पेपर मध्ये बघेन व १०–०० वाजता येताना पेढे घेऊन येईन.

तुम्हाला खोटे वाटेल परंतु श्रीसाईबाबांच्या चरणाची शपथ घेऊन सांगतो की मला ज्या पेपरची भीती होती त्या पेपरमध्ये १५० पैकी ८६ मार्क मिळाले व जो चांगला पेपर गेला होता त्यात १५० पैकी फक्त ४८ गुण मिळाले होते. म्हणजे मी "पास डिव्हिजन" मध्ये पास झालो होतो. ही सगळी किमया त्या कफनीधारी माणसाचीच. **साक्षात मीलन... आशीर्वाद पण! मी त्या वेळेस बाबांना ओळखू शकलो नाही.**

# नामे तारिले पाषाण

— वि. अ. कुलकर्णी

११८२/३६, ई वार्ड, शिवसदन कोल्हापूर,

● नामस्मरणाचे महत्त्व एखादा नास्तिकसुद्धा मानतो. अर्थात प्रत्येक जण आपल्या भक्ति भावनेनुसार नामोस्मरण करीत असल्यामुळे त्यात भिन्नता आढळेल परंतु शेवटी ते एकमेव परमात्म्याचेच नामस्मरण ठरते.

श्रुति म्हणते,

एतद्ध्येवाक्षारं ब्रह्म एतद्ध्येवाक्षारं परम् ।
एतद्ध्येवाक्षारं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ॥

(कठोप. १–२–१६ )

"हेच ओंकार अक्षर ब्रम्ह आहे. परब्रम्ह आहे. या ओंकारस्वरुप अक्षराला समजून मनुष्य जी इच्छा करतो त्या इच्छेला फलस्वरूप प्राप्त होते."

श्रुतिच्या मतानुसार कल्पवृक्षरूप भगवंताच्या कृपेने मनुष्याला इष्ट वस्तू प्राप्त होते परतु आत्म्याचे कल्याण इच्छिणाऱ्या सच्च्या भक्तांनी निष्काम भावनेने भगवंताच भजन म्हटले पाहिजे. शास्त्रामध्ये या निष्काम भक्तांचीच जास्त प्रशंसा केली आहे.

चतुर्विद्या भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्णथ ॥
तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ॥
प्रियो हि ज्ञानिमोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥

"हे भरतवंशातील श्रेष्ठ अर्जुना, उत्तम प्रकारे अर्थार्जन करणारे, आर्त, जिज्ञासु असेच निष्कामी कर्मयोगी मला भजतात. त्यातूनसुद्धा माझ्यामध्ये एकात्म भाव ठेवून मला भजणारा निष्काम कर्मयोगी मला अत्यंत प्रिय आहे."

अशा रितीने निष्काम भावनेने ईश्वराला पूजणारा भगवंताना एक क्षणभर देखील विसंबत नाही आणि परमेश्वरदेखील त्याला विसरू शकत नाही.

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥

जो पुरुष संपूर्ण जगात एकच विश्वरूप भगवंताला पाहतो, आणि परमेश्वरात विश्वाचे रूप पाहू शकतो तो माझ्यापासून दूर होऊ शकत नाही.

प्रेमी पुरुष आपल्या प्रेमस्वरुप मूर्तिशिवाय कसलीच मूर्ती हृदयात ठेवित नाही. तो अहर्निश आपल्या प्रेममय मूर्तिच्या स्मृतिमध्ये तल्लीन असतो. त्याच्याशिवाय त्याला दुसरे काहीच सुचत नाही. हे प्रेम भगवंताचे असते.

अशी अवस्था प्राप्त होईपर्यंत भक्ताला नामोच्चरणाचा अभ्यास करीत राहिला पाहिजे. नामोच्चारण करताना त्याला आपल्या शरीराचेसुद्धा भान राहता कामा नये. कितीही कठीण संकटे आली तरी भगवंताच्या भक्तिशिवाय त्याने संसारातील कोणत्याहि वस्तूची कामना करणाऱ्याला धरू नये. निष्काम भावनेने भगवंताची भक्ति करणाऱ्याला परमेश्वराची कृपादृष्टी खूपच लवकर होते. काही जण शंका व्यक्त करतात की, खूप जणांना नामस्मरण करून देखील भगवंताची कृपा होत नाही. याचा अर्थ असा की ह्यांनी नामोच्चरण विधिपूर्वक केलेले नसते किंवा नामस्मरण करताना संसारातील एखादी क्षुद्र वस्तू प्राप्त होण्याची इच्छा धरलेली असते. यात शंका नाही. म्हणूनच छोटी-मोठी कोणतीही संसारिक, भौतिक इच्छा मनात न धरता भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे.

महर्षि पतञ्जलजी म्हणतात.

'तस्य वाचक : प्रणवः।'

त्या परमात्म्याचे वाचक प्रणव ओंकार आहे.

'तस्य पस्तदर्थ भावनम्।'

'परमात्म्याच्या नावाचे स्मरण याचाच अर्थ त्यांचे चिंतन होय'

"ततः प्रत्यक्चेतनाधि गमोऽप्यन्तराया भावश्च ॥'

'परमात्म्याच्या नामस्मरणाने संकटाचा नाश होतो.'

या सर्वांचा अर्थ असा होतो की भगवंताचे नामोस्मरण करताना स्वरुप चिंतन असे नामोच्चरण असावे. भगवंताचे मनमोहक रूप डोळ्यासमोर आणल्यामुळे त्याच्या निरंतर भक्तिमध्ये अडचण येवू शकत नाही, म्हणूनच भगवंत म्हणतो,

तस्मात् सर्वेषु काठेषु मामनुस्मर युद्ध च ।
मय्यर्पितमनो बुद्धिर्यामे वैष्यस्यसशंयम् ॥

म्हणूनच हे अर्जुना, तुम्ही सारे युद्धाच्या वेळी देखील सतत माझे नामस्मरण करा. यामुळे तुमचे मन आणि बुद्धि यावर माझे नियंत्रण राहील.

भगवंताच्या या आज्ञेप्रमाणे साधकाला उठता, बसता, प्रत्येक कार्य करताना, भगवंताचे नामस्मरण करीत राहिले पाहिजे. यामुळे साधक एक क्षणभरदेखिल भगवंताला विसरू शकत नाही.

यावर जर कोणी असे विचारेल की भगवंताचे कोणते नाम घ्यावे आणि या अनंतरूपे परमेश्वराची कोणती मूर्ति चिंतनात आणावी तर याला उत्तर असे की साधकाला जे रूप अधिक आवडत असेल, ज्या रूपावर त्याची श्रद्धा असेल जे रूप चिंतनात आणून त्या रूपाचे नामस्मरण केल्यास अधिक लाभदायक बनते. ॐ नमो वासुदेवाय या मंत्राचे नमोच्चारण करणाऱ्या साधकांनी वासुदेवाचे चिंतन करावे. 'ॐ नमो नारायणाय' म्हणणाऱ्यांनी चर्तुभुज श्रीविष्णूचे चिंतन करावे.

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

हा सार्थ मंत्र जपणारा श्रीराम, द्वारकाधिपती श्रीकृष्ण, विष्णु या सर्वांचे नामस्मरण करून त्यांच्याच स्वरूपाचे चिंतन करीत असतो.

नामोस्मरणाची इतकी महती असताना अनेक लोक या भगवंताच्या पूजेत नामस्मरणाचा उपयोग का करीत नाहीत असा प्रश्न उभा राहिला असता याचे उत्तर इतकेच की या नामस्मरणाचे महत्त्व ज्याच्यावर भगवंताची कृपा असते तोच जाणू शकतो. अर्थात हे देखील खरेच की भगवंताची कृपा साऱ्यांवर समप्रमाणात असते. परंतु जोपर्यंत मनुष्य परमेश्वर कृपेचा अनुभव घेत नाही तोपर्यंत तो परमेश्वर कृपेचा लाभ घेऊ शकत नाही. ज्याप्रमाणे एखाद्याच्या घरात धनाचा गुप्त साठा असतो

परंतु घरच्या मालकाला जर ते माहीत नसेल तर तो त्या धनाचा लाभ त्याला होऊ शकत नाही. ज्या पुरुषाला त्या धनाचा साठा माहित होईल त्यालाच तो प्राप्त होईल. याचप्रमाणे भगवंताच्या कृपेचा अनुभव येताच मनुष्य भगवंताच्या भजनी लागतो. नित्य प्रेमाने भजन गायिल्यामुळे त्याची सारी पापे नष्ट होतात. आणि भगवंताच्या अधिक कृपेच्या त्याला लाभ होतो.

कबीरजी म्हणतात,

रामनाम रटते रहो जबलागि घटपे ज्ञान।
कबहूँ दीनदयाके, थनक परेगी कान ॥

म्हणूनच सारा संसाराच्या भौतिक गोष्टींना विष समजून त्याला आपल्यापासून दूर ठेवून परमेश्वराचे पवित्र पावन नामाचे स्मरण करणेच सर्वांचे परमकर्तव्य आहे. जो परमेश्वराचे नामस्मरण करतो दयाळू परमेश्वर त्याला मोक्ष प्राप्त करून देतो.

अनेकदा श्रीमंत माणसे धन प्रदान करून भगवंताला संतुष्ट करण्याचा प्रयत्न करतात. परंतु गरीब भक्ताला हे जमत नाही. म्हणून परमेश्वर गरीब माणसाकडे दुर्लक्ष करून श्रीमंतालाच प्रसन्न होतो हे साफ चुकीचे आहे. परमेश्वर गरिबाने अत्यंत मनापासून केलेल्या निष्काम पूजेनेच प्रसन्न होतो.

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ( गीता ४/११ )

परमेश्वर छोट्या-मोठ्यांचा विचार करीत नाही. एकादा छोटा मनुष्य त्याच्याकरिता जर व्याकुळ झाला तर परमेश्वरदेखील तितक्याच आर्ततेने त्याच्या भेटीस येतो.

अशा रितीने या क्षणभंगुर, नाशवान् संसारातील मिथ्या गोष्टींचा त्याग करून सर्वशक्तिमान, न्यायकारी, परमदयाळू करुणामयी अशा परमेश्वराचे निष्काम प्रेमभावनेने नामस्मरण करून पूजणे अत्यंत हितकारक आहे.

..............

# भक्ती

● श्री. दिलीप दत्तात्रय जोशी
डागावाडी, सुभाषचौक कामठी, नागपूर

● साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।।

ज्या दिवशी साधु संतांची पावलं आपल्या घरी पडतील तोच खरा आनंदाचा दिवस, सणाचा दिवस. तुम्ही कदाचित म्हणाल, 'हे चरण आम्ही पुष्कळ वेळा ऐकलंय.' "पण त्यात काय आहे ? आणि साधु संत आलेत म्हणून इतका आनंद तरी का व्हावा ?" तर त्याचं असं आहे की हे साधु, संत हे देवाचे प्रतिनिधी नव्हेत परमेश्वरच म्हटले तरी चालेल ,आणि अशा ह्या परमेश्वराची पदकमले आपल्या घरी पडावी ह्यापेक्षा मोठा कोणता बरे आनंद असावा ! असो ! पण आपण कितीतरी वेळा साधु आणि संत हे शब्द ऐकतो. आणि आपल्याला सहजच प्रश्न पडतो की ह्या दोघांपैकी मोठा कोण ? तसं पहिलं तर दोघेही आपापल्या क्षेत्रांत मोठे आहेत. परमेश्वरास दोघेही सारखेच प्रिय असतात. पण तरीही संतांचा अधिकार साधूपेक्षा मोठा आहे असे मला म्हणावेसे वाटते. कसे ? ते आपण आता पाहु या. साधु हा देवाला मिळवतो तो भक्तीमार्गाने. तुमच्या आमच्या सारखा संसारात न पडता जंगलात जाऊन खडतर तपश्चर्या करून देवास प्राप्त करून घेणारा हा तो साधु. आणि संतांचं तत्व मात्र ह्यापेक्षा निराळं. ते कुठेही असोत, सदैव देवाच्या चिंतनात मग्न असतात, त्यांनी स्वतःचा विवेकच मुळी परमेश्वरास अर्पण केलेला असतो. ते येथे उरतात ते फक्त देहापुरतेच. त्यांच्या देहाचे तुम्ही काहीही करा, त्यांच्यावर परिणाम होत नसतो. साधु मात्र त्यांची तपश्चर्या भंगली की तत्काळ रागात येऊन शाप देतात (होते) मग आता शिरडीची साईमाऊली तसेच शेगावची गजानन माऊली हे साधु होते की संत ह्याचा निर्णय तुम्हीच त्यांचे चरित्र वाचून करू शकता आता इथे एक शंका येण्यासारखी आहे की जर संत स्वतःचा विवेक परमेश्वरास अर्पण करतील तर त्यांचा पंचेंद्रियांवर ताबा कसा राहील ? पण तुम्हीच विचार करा ' विवेक पंचेंद्रियांवर ताबा ठेवतो, आणि जेव्हा विवेकच परमेश्वररूप होईल तेव्हा परमेश्वरच पंचेंद्रियांवर ताबा ठेविल. आणि म्हणूनच संत करतो ते प्रत्येक कार्य मंगल

असतं. पण संत होणं ही प्रत्येकाला साधण्यासारखी गोष्ट नाही. पण साधु होणे मात्र आपणास शक्य आहे. आता साधु ज्या मार्गानी देवास प्राप्त करून घेतो तो मार्ग म्हणजे भक्ती. आता भक्ती म्हणजे नेमकं काय? तर भक्ती म्हणजे काय? ह्या प्रश्नाचे उत्तर असे की "परमेश्वराबद्दल मनात श्रद्धा सद्‌भावना, प्रेम आणि आत्मियता ह्या चार पाकळ्यांचे फूल म्हणजे भक्ती. मग तुम्ही म्हणाल मग पूजा, अर्चा, आरती इ. कशाला हवे. तर ह्याचे उत्तर असे की ह्या भक्ती फुलात रस, रूप, गंध, सुवास आहे, आणि असे हे रस, रूप, गंध, सुवासयुक्त फूल जर तुम्ही देवास वाहिले तर तो सदैव तुमचाच आहे. पण आजकाल आपण मुख्य भक्तीरूप फूल सोडून रस-रूप गंध देवास वाहातो. आणि साधु (आजकालचे). त्यांचे तर असे वर्णन करावे लागेल–

जे का पैसे, अडकेवाले।<br>
त्यासी म्हणे जो आपुले॥<br>
तोचि (स्वार्थं) साधु ओळखावा।<br>
चोर तेथेंची जाणावा॥

अशा साधुंना देव तर कदापिही भेटणे शक्य नाही. तेव्हा अशा साधुंपासून बचावून खऱ्या साधुची कास धरा अथवा भक्तीरुपी फुलाच्या चारही पाकळ्या उमलू द्या. मग हे फूल म्हणजे स्वार्थाच्या चिखलातील कमळ असो वा निस्वार्थाच्या सुंदर पाण्यातील कमल असो किंवा सदिच्छेच्या लतिकेवरील पुष्प असो, तो परमात्मा धावून आल्याशिवाय राहाणार नाही.

# जागेल साई योग क्षेमार्थ

● ले. ज. प्र. मिरीकर
'यशवंत प्रसाद' मिरी, जि. अहमदनगर.

● माझी पुतणी सौ. शुभांगी पोतदार, २५ मार्च १९७७ रोजी एकटीच मुंबईहून विमानाने ओटावा (कॅनडा) येथे गेली. या प्रवासात थेट विमानाची सोय नसल्याने वाटेत लंडनला २० तास थांबून पुढे तेथून मॉंट्रीयलला जाणे जरूर होते. मुंबई-लंडन मार्गावर 'दुबई' येथील उड्डाणाचे वेळी विमान अचानक नादुरुस्त झाल्याने लंडनला पोहचण्यास साडेसहातास उशीर होऊन ती रात्री ९ वा. लंडन विमानतळावर पोहचली. परदेशातील तिचा हा पहिलाच प्रवास, तशांत अपेक्षित वेळे पेक्षा खूपच उशीरा व तेही रात्री लंडनला पोहचणे, तसेच तिच्या सासरपैकी नातेवाईकांना विमानतळावर येण्याबद्दल केलेली केबल न मिळणे, यामुळे सौ. शुभांगीला तेथे त्या, वेळी काय करावे हा प्रश्न पडला. ब्रिटीश एअरवेज विमान कंपनीने लंडनमधील एका हॉटेलात तिच्या मुक्कामाची स्वतंत्र खोली राखून व्यवस्था केली होती, तरीही ती तेथे भांबावून गेली असल्यास नवल नाही.

परंतु अशा भांबावलेल्या स्थितीत साईबाबा तिच्या मदतीस धावून आले कारण ती स्वतः कट्टर साईभक्त आहे. तिच्याच विमानाने मुंबईहून लंडनपर्यंत आलेल्या सौ. समर्थ नावाच्या एका महाराष्ट्रीयन बाईंनी सौ. शुभांगीची लंडन विमानतळावर त्यावेळी चौकशी केली व त्यांनाही मॉंट्रीयलला जावयाचे असल्याचे सांगितले. तिची अडचण आस्थेने समजावून घेतली व त्यांना लंडन विमानतळावर भेटण्यास आलेल्या सद्गृहस्थांना विनंती करून लंडनमधील सौ. शुभांगीच्या नातेवाईकांना फोन करविला. त्यानुसार ते विमानतळावर आले व सौ. शुभांगीला त्यांचे घरी घेऊन गेले. दुसऱ्या दिवशी दुपारी त्यांनी तिला मॉंट्रीयलला जाणाऱ्या विमानात बसवून दिले. मॉंट्रीयल विमानतळावर तिचे यजमान श्री. वसंतकुमार पोतदार तिला नेण्यास आले होते, त्यांचेसह नंतर ती ओटावा येथे सुखरूप घरी पोहोचली.

योगायोगाने प्रवासात लोकांची मदत मिळण्यात आश्चर्यकारक वाटण्यासारखे काय ! असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु ईश्वरी संकेत त्याहूनही निराळे

असतात. सौ. शुभांगीचे लग्न ३० डिसेंबर १९७६ रोजी झाले, त्यावेळी तिचे "श्रीसाई सत् चरित्र" पोथीचे पारायण अपूर्ण राहिले होते. लग्नानंतर यजमानांसमवेत ता. १४ जानेवारी ७७ रोजी कॅनडास जाण्यासाठीच प्रयत्न दिल्ली येथे जाऊन करण्यात आले होते. सर्व काही व्यवस्थित पार पडले होते. फक्त एका दाखल्यासाठी हे काम अडले व व्हिसा पूर्ण न झाल्याने सौ. शुभांगीचे कॅनडाला जाणे पुढे ढकलले गेले. श्री. पोतदार ठरलेल्यावेळी एकटेच कॅनडाला गेले. त्यानंतर २ महिने व्हिसाची वाट पहावी लागली. एके दिवशी अहमदनगर येथे दुपारी पोस्टाने व्हिसा मिळाल्याचे पत्र सौ. शुभांगीचे हाती आले, त्यावेळी तिची "श्रीसाई सत् चरित्र" पोथी नुकतीच पारायण पूर्ण होऊन ती बाबांची आरती करीत होती. लग्नाचेवेळी अपूर्ण राहिलेली पोथी पूर्ण करण्याची सूचना तिच्या आजी श्री. माईसाहेब मिरीकर यांनी तिला वेळीवेळी दिली. श्री. माईसाहेबांच्या म्हणण्याची प्रचिती, श्रीसाईबाबांनी त्वरित दाखविली.

सौ. शुभांगीला, यजमान कॅनडास पुढे गेल्याने आता एकटेच जावे लागणार म्हणून मी तिला वेळोवेळी धीर देऊन सांगत असे की, "तुझ्या विमानप्रवासात तुला एक महाराष्ट्रीयन बाई भेटतील व तुला घरी पोहचवतील. साई सांभाळणारे आहेत तरी काळजी करू नकोस." ही गोष्ट श्रीसाईबाबांनीच माझेकडून वदवून घेतली व त्याची जाणीव तिला करवून दिली. लंडन विमानतळावर सौ. समर्थ यांची भेट व मदत हा योगायोग श्रीसाईच्या इच्छेनेच घडून आला.

साई सत् चरित्राचे पारायण संपताच हाती येणारा व्हीसा व विमानाच्या प्रवासात झालेली मदत ही साई इच्छेने वदवून घेतलेली भविष्यवाणी खरी होणे ही साईकृपा अगम्य आहे.

माझे चुलते कै. गो. य. उर्फ बाळासाहेब मिरीकर हे कोपरगाव येथे मामलेदार असताना स्वतः साईबाबांनी (हयात असताना) त्यांना संकटाची पूर्व सूचना दिली व श्री. शामा देशपांडे यांनाही मदतीस दिले. सौ. शुभांगीचे परदेशगमनाचेवेळी असाच प्रसंग पुन्हा घडण्याचे भाग्य आमच्या मिरीकर घराण्यास लाभले आहे. "जागेल साई योगक्षेमार्थे" या उक्तीचे हे प्रत्यंतर नव्हे का ?

.............

# विश्वास ठेवा अगर ठेवू नका पण हे घडले

● श्री. केशव पहाडे,
झेंडा चौक, धरमपेठ, नागपूर, १०

● मी वंदनीय श्रीसंत गुलाबबाबा यांचा भक्त आहे. संपूर्ण विदर्भातच नव्हे तय पूर्ण महाराष्ट्रात श्री संत गुलाबबाबा दिवसेंदिवस त्यांच्या निस्सीम प्रेमाने लोकप्रिर आहेत याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या समवेत श्रीक्षेत्र पंढरपूर, आळंदी, पुणे, मुंबई, त्र्यंबकेश्वर, शिरडी आदि ठिकाणी फिरत असताना प्रत्यक्षात घेतला आहे. श्री संतर गुलाबबाबा सोबत मुंबई येथे श्री साईभक्त डॉ. गव्हाणकर यांचेकडे आम्ही सर्व भक्त मंडळी होतो. ज्या क्षणी श्री संत गुलाबबाबांनी डॉ. गव्हाणकर यांचे घरी प्रवेश केला तेव्हा डॉ. गव्हाणकर उद्‌गारले—" एकवीस वर्षापूर्वी प्रत्यक्ष श्री साईनाथांनी मला कबूल केल्याप्रमाणे आज ते प्रत्यक्ष साईंनाथाचे रूपात आलेले आहेत " असे म्हणून त्याचे अंतःकरण व कंठ अतिशय दाटून आला.

जुलै ७६ मध्ये श्री साईनाथांचे दर्शन घेऊन मी जेव्हा नागपूरला परत आलो आणि आश्चर्य म्हणजे श्री साईनाथाचे घरी, ऑफीस व इतर ठिकाणी वावरत असताना सतत् नामस्मरणाचा जप सहजरित्या आपोआप सुरू झाला.

शनिवार दिनांक ११ डिसेंबर १९७६ रोजी माझे वडीलभावाचे नागपूर मेडिकल हॉस्पिटलमध्ये अतिशय चिन्ताजनक असे अल्सरचे ऑपरेशन झाले. तेव्हा प्रकृती अतिशय चिंताजनक होती. रविवार दिनांक १२ डिसेंबर १९७६ रोजी रात्री मला एक विलक्षण स्वप्न पडले. त्यात माझे घरी देव्हाऱ्यात असलेले श्री साईनाथ, श्री गजानन महाराज, श्री गोपालकृष्ण आदि तसबिरी एकाएकी नाहीशा झालेल्या दिसल्या. त्यामुळे मी अत्यंत चिंताग्र मनःस्थितीत असल्याचा भास झाला व मी रडत आहे व त्याच क्षणी श्री साईनाथाचे दोन्ही पाय धरून मी अक्षरशः साई ऽऽऽ म्हणून जोरात हंबरडा फोडला. माझा हा आक्रोश पाहून माझी पत्नी जागी होऊन तिने मला नीट जागे केले तेव्हा समोर पाहतो तो कुणीही नव्हते. जाग आल्यावर या प्रसंगाबाबत—माझे पत्नीने विचारणा केली असता तेव्हा तिला स्वप्नातील संपूर्ण वृत्तांत कथित केला. फोटो सर्व जागच्या जागीच होते. स्वप्नात माझे हे रडणे म्हणजे आप्त दिवंगत झाल्यानंतर कोणी जसा हंबरडा फोडतो त्याप्रमाणे हा सारा प्रकार होता.

श्री साईनाथाचे चरण स्पर्श म्हणजे माझ्या वडीलभावाची मृत्युतून सुटका झाल्याचा प्रत्यय मला आला. सोमवार दि. १३ डिसेंबर ७६ पासूनच माझे भावाला पूर्ण आराम वाटू लागला, व त्याची प्रकृती आता अतिशय उत्तम आहे. श्री साईनाथ, ताजुद्दीन, श्री संत गुलाबबाबा आदि संतांचे सतत नामस्मरण मुखात का असावे हे एक अनाकलनीय कोडे आहे असे वाटते. एव्हढेच नव्हे तर व्यवहारात प्रत्येक कठीण प्रसंगी साईनाथ मदतीला आल्याचे अनुभवास येत असते. सारांश श्री साईनाथ आज प्रत्यक्षात आपणात नसले तरी अनाथाचे रक्षण करणारा हा साईनाथ आजही आपणामध्ये हजर आहे अशी या प्रसंगावरून जाणीव होते. श्री साईनाथांचे चरणी कोटी प्रणाम.

.............


# संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबा

## आता लौकरच प्रकाशित होणार

: लेखक :

**• श्री. का. सी. पाठक**

कोर्ट रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान

**• सदानंद चेंदवणकर**

कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला

+ श्रीसाईबाबांचे सचित्र चरित्र

+ श्रीसाईनाथकालीन व्यक्तींची भरपूर छायाचित्रे

+ श्रीसाईनाथांचे मुखपृष्ठावर संग्राह्य चित्र

**श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे नवे प्रकाशन**

आपली प्रत आगाऊ राखून ठेवण्यासाठी आजच लिहा.

विशेष तपशील पुढील अंकी

**दिवाळी अंकांचा बादशहा**

## पुण्याच्या श्रीसाईनाथ मंदिराचे भव्य उद्घाटन

रासने चाळ, शिवाजीनगर पुणे—५ येथील श्रीसाईनाथ मंदिराचे भव्य उद्घाटन ता. २८ एप्रिल ७७ रोजी सायं. ६ वा. श्रीसाईपादानंद ऊर्फ श्रीराधाकृष्ण स्वामीजी, अध्यक्ष अखिल भारतीय साईसमाज, मद्रास यांचे शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी पुण्याचे उद्योगपती व समारंभाचे अध्यक्ष अतुर संगतानी, मंडळाचे अध्यक्ष श्री. पी. एस. राव, श्री. नानासाहेब रासने, श्री. सूर्यकांत गर्जे, मंडळाचे चिटणीस श्री. एस. रामकृष्णन इ. ची मंदिराच्या प्रगतीबद्दलची भाषणे झाली. श्रीराधाकृष्ण स्वामीजींनी श्रीसाईबाबांची महती आपल्या भाषणातून कथन करून जीवनात सुखशांतीची बाग फुलवायची असेल तर बाबांच्या भक्तीचे अमृत सिंचन करावयास हवे असे सांगून मंदिरास ५०१ रु. ची देणगी जाहीर केली. याप्रसंगी मंदिरासाठी कष्ट उचललेले श्री. एम. पी. भरुचा, श्री. एन. डी. जोशी, श्री. प्रभाकर, श्री. नानासाहेब रासने व श्री. एस. रामकृष्णन यांचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. श्री. पट्टाभिरामन यांनी आभार मानले. *


वर्षातून पाच खास अंक प्रकाशित करणारे

# मराठीतील एकमेव मासिक श्रीसाईलीला

१) रामनवमी विशेषांक
२) श्री दत्तगुरू विशेषांक
३) श्री पुण्यतिथी विशेषांक
४) दिवाळी भक्त स्वानुभव विशेषांक
५) श्रीसाई काव्यबहार विशेषांक

वार्षीक वर्गणी अवघी सहा रुपये ट. ह. सह

# श्रीसाईबाबा हाच चमत्कार

[ लेखक–डॉ. केशव भगवंत गव्हाणकर, प्रकाशक–श्री. धनंजय बाळकृष्ण ढवळे, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, गिरगाव, मुं. ४. पृष्ठे १५९ किंमत ५ रु. ]

श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेले मुंबापुरीतील प्रसिद्ध साईभक्त, डॉक्टर श्री. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर यांनी हे पुस्तक लिहिलेले आहे. 'शिलधी' व 'शिरडीचे साईबाबा' ही अण्णासाहेबांची दोन पुस्तके यापूर्वीच प्रकाशित झालेली आहेत. त्यामध्ये या पुस्तकाने मोठी मोलाची भर घातलेली आहे. मानवता, बंधुभाव व सहजीवनासाठी आवश्यक असणाऱ्या विविध गुणांची गुणमूल्ये ज्यांनी आपल्या आचरणाने व प्रत्यक्ष उपासनेने सिद्ध करून लक्षावधी जीवांना भक्त या उच्च भूमिकेत दृढ केले, त्या संतचूडामणि भगवान श्रीसाईबाबांचे चरित्र, जीवनकार्य व अवतार रहस्य हाच मोठा चमत्कार आहे. डॉ. गव्हाणकरांनी श्रीबाबांच्या चरित्रातील सूक्ष्म व गूढ अशा अनेक घटनांची मोकळी अशी मेजवानी या पुस्तकातून सर्वांसाठी दिली आहे. याबद्दल अण्णासाहेबांना धन्यवाद द्यावेत तितके थोडेच आहेत.

# स्वामी मुक्तानंद

[ लेखक–श्री. वसंतराव मालपाठक, प्रकाशक–धनंजय बाळकृष्ण ढवळे, पहिली भटवाडी, गिरगाव, मुं. ४. पृष्ठे ४८ किंमत ३ रु. ]

वज्रेश्वरी जवळील गणेशपुरी येथील श्रीगुरुदेव आश्रमाचे सर्वस्व, परमहंस श्री मुक्तानंद स्वामी यांचे जन्मापासून तो आजवरचे संपूर्ण जीवन चरित्र लेखकाने या छोटेखानी पुस्तकात रेखाटलेले आहे व ते वाचनीय असे झाले आहे. पुस्तक सचित्र असल्याने ते आणखीच आकर्षक झाले आहे. श्रीबाबांच्या प्रत्येक मराठी भक्ताने हे पुस्तक अवश्य संग्रही ठेवावे अशी आमची शिफारस आहे.

—साईनंद

# साईनाम नित

तूं भक्तजनांना भेटतसे,
प्रभु श्रवणिं माझिया हेच असे! ॥ ध्रु०॥
तूं सकल व्यापुनी उरलासे
मी ठायिं ठायिं तुज धुंडितसे,
परि दर्शन 'साई' कां न तसे ? प्रभु...॥१॥
अपराध कशाचा ? काय घडे ?
व्याकूळ मनाला प्रश्न पडे
हे उकलिल कोडें कोण कसे ? प्रभु... ॥२॥
मुखिं साईनाम नित रातदिनीं,
बघ सदाचार मम आचरणीं,
का भजनि पूजनीं दोष दिसे ? प्रभु... ॥३॥
तूं विश्वचालका वनीं जनीं,
मी धुंडत हिंडत मूर्खमणी
ह्या अंतरांत तव वास असे
मम श्रांत मनाते बोध ठसे! प्रभु... ॥४॥

● लक्ष्मीतनय
न्यु. कॉलनी, जे३ ।४ बर्वेनगर, घाटकोपर मुंबई ८४.

# श्रीसाई गीत

(चाल : ते मन निष्ठुर कां केले)

प्रेमळ तूं जगताचा राम । दे चरणी पूर्णविराम ॥ ध्रु० ॥
नानावेषा येऊनी जन्मा, पुरविशी मनिचे काम ॥ प्रेमळ तूं ॥ १ ॥
भक्तिदृढतर ठेवि निरंतर । तारिल प्रभुचे नाम ॥ प्रेमळ तूं ॥ २ ॥
ना - जगती - मज, अन्य दिसेना । तुझेच मजला धाम ॥ ३ ॥
अपराधी मी बहुतची असलो । बाळ तुझा हा - राम ॥ प्रेमळ तू ॥ ४ ॥

● पी. आर. जोशी
१६३, शनवार पेठ, ओंकार वाडा, पुणे ३०

# शिरडीच्या वाटेवर

शिरडीच्या वाटेवर
सुगंधाची लयलुट
मनःशांति समाधान
कशाचीहि नाही तूट
आधी - व्याधी चिंता - दुःख
पळतसे दूर दूर
माऊलीच्या दर्शनाची
लागे मनीं हुरहूर
तृणबाळें तरू वेली
सारी कशी बहरली
शिरडीच्या वाटेवर
भावभक्ती मोहरली
सूर्य चंद्र ताऱ्यांसंगे
वाटे नभ धांव घेते
शिरडीस जातां जातां
तहानभूक हरपते
शिरडीच्या वाटेवर
पानोंपानीं 'साई' दिसे
विश्वव्यापी विश्वंभर
साऱ्यांच्या जो हृदीं वसे.

● विजय द. हजारे एम्. ए
सी/६, गुंफादर्शन हाऊसिंग सोसायटी
फर्स्ट कॉर्टर रोड, बोरीवली (पूर्व
मुंबई ४०० ०६६

# पूर्तता

न मागता देई
असा देव साई
चराचरी राही
साईराज माझा ॥
मूर्तिमंत रुप
देई सर्वां सुख
उभा ठाके सन्मुख
कुणाचे रुपाने ॥
दुर्धर विघ्न
होती भग्न भग्न
साईनामी मग्न
जो जन राहे ॥
आंधळ्याची काठी
ऐसा जगजेठी
भेटू दे मला हो
मन शांतीसाठी ॥

● जयवंत ना. आंबेरकर
भांडुप, मुंबई

# श्रीसाईनाथाची भूपाळी

जोडूनिया कर साईचरणी ठेविला माथा ।
ऐकावी प्रार्थना माझी श्रीसद्‌गुरु साईनाथा ॥ १ ॥
असो नसो भाव आलो तुझीया पायीं ।
कृपादृष्टी पाहें मजकडें माऊली सद्‌गुरु साई ॥ २ ॥
सदोदित असावें वाटतें तुझीया पायी ।
सोडुनी संकोच ठाव तूं मजला देई ॥ ३ ॥
वेडेवाकुडे गाईन परि तुझें नाम घेईन ।
सदासर्वकाळ साईनाथा तुझें गुण गाईन ॥ ४ ॥

● मुरलीधर घोलप
६५३, सहकारनगर नं. २.
चेंबूर, मुंबई ७१.

# ॥ बाबा बैसले शिळेवरी ॥

( चालः—किती मौज दिसे ही पहातरी। हे विमान फिरते अधांतरी ॥ )

किती लोभस दिसते मूर्ती ही । बाबा बैसले शिळेवरी ॥
भक्तांच्या त्या दाटी दाटीतुनी । प्रसन्न दिसतो हा श्रीहरी ॥
राज्यांचा तो राजा असुनी । वेष घेतला फकिरापरी ॥
लांब लांबूनी भक्त येवूनी । सेवा करिती परोपरी ॥
किती मौज दिसे ही पहातरी । बाबा बैसले शिळेवरी ॥ १ ॥

गोदा काठीं शिरडी ग्रामी । अवतरली ही पंढरी ।
पंढरीरायाची पुण्य नगरी । भक्तांचे दुःख हरी ।
गोकुळचा तो हा श्रीहरी । भक्तांची दुःखे निवारी ।
अयोध्येचा प्रभुराम तरी । भक्तांसाठी अवतरला घरी ।
किती मौज दिसे ही पहातरी । बाबा बैसले शिळेवरी ॥ २ ॥

नित्य नेमाने करिती आरती । भक्त सारे घालिती फेरी ।
उदी प्रसाद हा त्यांचा देवूनी । कष्ट रोग सारे सारी ।
धिरता गंभीरता यह जिवन । मंत्र तयांचा परोपरी ।
दुर्गुणांचा करूनी त्याग । सबुरी निष्ठा हाच वैराग ।
किती मौज दिसे ही पहातरी । बाबा बैसले शिळेवरी ॥ ३ ॥

व्दारकामाई पवित्र खरी । किती एका दृष्टांतभेटी ।
संकटकाळी धावून येई । भक्तासाठी हा जगजेठी ।
बैसला पहा गोदा तटी । होईल अखंड दर्शनभेटी ।
श्रद्धेने जो येईल येथे । मनोदय पूर्ण पावेल खरी ।
किती मौज दिसे ही पहातरी । बाबा बैसले शिळेवरी ॥ ४ ॥

• कु. शालिनी स. देशपांडे, एफ. वाय.
रामदास कॉलनी ११, जळगाव

# श्रीसाईंचा पाळणा

(चाल : रघुपती राघव राजाराम । पतित पावन साईनाम)

नव महाराष्ट्रात नगर जिल्हयात ।
लहानशा एका शिर्डीगावात ।
साईबाबाचे महत्व हे फार ॥ ध्रु० ॥
जो बाळा रे जो...

संसार प्रवाहात होतो वाहत ।
साईनाथ मज देऊन हात ।
माझे थारविले चित्त ॥ १ ॥
जो बाळा रे जो...

बाबा माझ्या घरी आले ।
दर्शन त्यांचे रोज झाले ।
मना वाटे आपले कामच झाले ॥ २ ॥
जो बाळा रे जो...

ध्यानी मनी स्वप्नी बाबा बसले ।
जेथे जाई तेथे बाबा दिसले ।
यशच माझ्या हाताला आले ॥ ३ ॥
जो बाळा रे जो...

वर्षात एक प्रकार झाला ।
वहिनीला माझ्या हुकुम आला ।
आजच जावे ऑफिसला ॥ ४ ॥
जो बाळा रे जो...

आनंद झाला आम्हा सर्वांना ।
नमस्कार केला साईबाबांना ।
काय कमी आम्हांला आता ॥ ५ ॥
जो बाळा रे जो...

जन्माचे माझे सार्थक झाले ।
आज माझे भाग्य उदेले ।
नाही विसरणार साईबाबाला ॥ ६ ॥

जो बाळा रे जो...

भाव भक्तीचा पाळणा । गुरू साईनाथ राणा ।
हालविती नरनारी, रखमा । आणिक मुनिजन, बाळा ।। ७ ।।
जो बाळा रे जो...

● रखमा डोंगरे
बालवाडी शिक्षिका,
घरांक–१९६ पाषाणगाव, पुणे ८

## साई के उपकार

साई आप प्यार का सागर है
साईने इन्सानके मिटाये गम ।

साईने इन्सानको आस्तिक बनाया
साईने इन्सानको कठिनायोंसे निभाया
साई आप इन्सानके मालिक है ।

साईने इन्सानको हर सुख दिया
साईने इन्सानको हर मदद किया
साई आप इन्सानके साथी है ।

साईने इन्सानको भगत बनाया
साईने इन्सानको जिंदगीका राह दिखाया
साई आप इन्सानके राही है ।

कु. अनारबाला य. शिवलकर
ए १५, रु. नं. २, इंद्रायुध को. आ.
हाऊसिंग सोसायटी, म्युनिसिपल कॉलनी,
एम्. जी. रोड, गोरेगाव (पश्चिम) मुं. ६२

# मागणें

साईनाथा मजसी प्रसाद द्या
कुरवाळा, मज शांति द्या ॥ ध्रु० ॥

कणाकणातुनि भरला आपण
विरवा हलकें माझें मीपण
एकपणा मज अनुभवुं द्या ॥ १ ॥

बसल्या ठायीं नयन मिटावे
मिटल्या नयनीं आपण यावें
भावभेट नित ध्यानीं द्या ॥ २ ॥

वामहस्त दक्षिण चरणावर
श्वेतवसन मुनि बसे शिळेवर
सोऽहं चा मज छंद द्या ॥ ३ ॥

कामक्रोध हा झाडा कचरा
बरसा हृदयीं अमृतधारा
प्रेमळ वृत्ती अपुली द्या ॥ ४ ॥

श्रद्धा द्यावी, सबुरी द्यावी
साधन करण्या सन्मति द्यावी
आशीर्वच उत्तेजन द्या ॥ ५ ॥

चैतन्याचा ध्यास लागुं दे
चैतन्याचें गीत गाऊं दे
कीर्तन रंगीं नाचूं द्या ॥ ६ ॥

देहांतूनि न्या देवापाशी
मला जाणवो मी अविनाशी
"तत् त्वम् असि" हा प्रत्यय द्या ॥ ७ ॥

● श्रीराम बाळकृष्ण आठवले एम्. ए. बी. टी.
बलवंत सदन, ३४४, नवी पेठ, पुणे ३०.

# शिरडीचा राणा

दयाघन प्रभूवर हा आला ।
शिरडी ग्रामी साईरूपे प्रगटहो जाहला ॥ ध्रु० ॥
भाव तयावरी असे जयाचा तारक तोची तयाला
ध्यास अंतरी धरिता त्याचा देई दर्शनाला ॥ १ ॥
मंदिरात जी ज्योत तेवते । प्रकाश देई ती सकलाते
स्वानुभवाने कळते त्याते । तोची वंदी तयाला ॥ २ ॥
दुःख निवारी भवभयहारी । तोची तारी भवसंसारी
दिनजनांचा तो कैवारी । वाहू सुमनाला ॥ ३ ॥
नयनी घालुनी ते ज्ञानांजन । हृदयामाजी द्या सिंहासन
सद्‌गुरुराणा तिथेच बसवून । करुनी घ्या आपुला ॥ ४ ॥

• स. मा. मुऱ्हार
चंदननगर, हौसिंग सोसायटी, क्वा. नं. १२३,
मेडिकल रोड, नागपूर.

# शिरडी में हुए साईनाथ

शिरडी में हुए साईनाथ । शिरडी में हुए साईनाथ ॥ ध्रु० ॥
तेरे दर्शन के प्यासे हम । शिरडी में हुए साईनाथ ।
पावन कर दी तूने शिरडी । जन्म लेके नाथ ।
क्या-क्या तूने चमत्कार दिखाकर । सबको जीत लिया ।
साई तो हुए सबके । नाथ भूलेंगे कहाँसे हम ॥ ध्रु० ॥
जिधर भक्तपर आये आपत्ती । उधर है चले साई ।
क्या-क्या तूने कष्ट पाकर । भक्तोंकी रक्षा की ।
साई जो नाम स्मरे । पाप करेंगे कहाँ से वे ॥ २ ॥
हिंदू-मुस्लिम भेद मिटाकर । सबको एक किया ।
राम-रहिम एक दिखाकर । सबको अपना किया ।
साई तो थे भगवान । नाथ भूलेंगे कहाँ से हम ॥ ३ ॥
शरण तुम्हारी आया हूँ मैं । दर्शन दे दो नाथ ।
अंतिम इच्छा नाथ है मेरी । रहू सदा तेरा दास ।
साई को मेरा प्रणाम । नहीं भुलूँगा कदापि मैं ॥ ४ ॥

• श्री. हसमुख ओंकार पाटील
गुजर गल्ली, मु. पो. नवापूर, जि. धुळे.

# प्रकाश–पूजा

भोर भयी जागो जगजीवन
कण कण में भर दो संजीवन !

तेजमयि हो, तेज हमें दो
वीर्यवान वीरता हमें दो
कर्मयोग के महाप्राण कराओ
विकास पथ के मंगल दर्शन !

शक्तिमान हो, शिवशक्ति दो
जयशाली हो, अजेयता दो
स्नेहमयि सब द्वेष मिटा दो
निपटाओ दुख दुर्जन-क्रंदन !

वेद, बायबल और कुरान के
गीत प्रभू तेरी महिमा के
कोटि रंग किरन अमृत के
बिखराये नव श्रद्धा पावन !

नयी उमंगे, स्वप्न नये दो
रंग गंध संगीत नया दो
नव सृजन की यज्ञवेदी में
निकलो ओजस्वी अग्नि वन !

• चन्द्रशेखर लिगाडे
C/o श्री. एन्. टी. लिगाडे, ॲडव्होकेट
मु. पो. तालुका–मोहोळ जिल्हा–सोलापूर

# अथ श्रीसाईनाथ कवचम्

अभीष्टफलदं देवं सर्वज्ञं परमेश्वरम् ।
भक्तपराधीनं शान्तं प्रणमामि साईनाथम् ॥ १ ॥

प्रेमप्रदः शिरः पातु भालं पातु साईराजः ।
वासुदेवः कर्णौ पातु नेत्रे शुद्धसत्त्वस्थितः ॥ २ ॥

जिव्हां पातु लोकनाथो नासां मे भास्करप्रभः ।
मुखं पातु सिद्धेश्वरः कंठं मे पुरुषोत्तमः ॥ ३ ॥

स्कन्धौ सर्वाभीष्टप्रदः भुजौ पातु सुलोचनः ।
करौ साईनाथः पातु हृदयं चापद्बांधवः ॥ ४ ॥

नाभिं पातु नित्यानंदो मध्यं पातु सुखप्रदः ।
कटिं पातु सत्पुरुष ऊरू मे पातु महेशः ॥ ५ ॥

जानुजंघे सर्वात्मकः पादौ मनोवागतीतः ।
पातु प्रियोऽखिलं वपुः प्रणमामि योगेश्वरम् ॥ ६ ॥

इत्येतत्कवचं दिव्यं यो नरो नित्यं स्मरेत् ।
सर्वान्कामानवाप्नोति सर्वत्र विजयी भवेत् ॥ ७ ॥

इति श्रीसाईनाथ कवचम्

रचनाकार : श्री. ल. म. तथा बापूजी रणदिवे बी. ए.
तावडे बिल्डिंग, कुंभारवाडा, दादर, २८.

.............

—श्रीसाईलीला—
खास गुरुपौर्णिमा अंक
१ जुलै १९७७ रोजी प्रसिद्ध होणार
श्रीदत्तविषयक भरपूर साहित्य व कविता

# शिरडी-वृत्त माहे एप्रिल सन १९७७

या महिन्यात श्रींचे दर्शनासाठी बाहेरगावचे बरेच साईभक्त येऊन गेले. खालील कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली.

**कीर्तन** १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे महत्त्वाचे दिवशी झाली.

२) ह. भ. प. माधवबुवा र. सागटले मराठवाडा. कीर्तन

**प्रवचन** १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिर्डी.

२) ह. भ. प. जगन्नाथबुवा वाघचौरे शिर्डी.

**गायन, वादन** १) श्री. भालचंद्र ना. मोडक, ठाणे.

**भजन** २) कु. विभावरी द. अंतरकर, जि. ठाणे.

३) सौ. मधुबाला चावला, मुंबई. ४) सौ. सीता टिप-णीस, मुंबई. ५) श्री. चोखीलाल खेडूले, रायपूर. ६) श्री. विलास द. वरळीकर, मुंबई ७) ह. भ. प. बाळासाहेब मावळदकर, पुणे. ८) सौ. माणिक वर्मा, मुंबई. ९) श्रीमती सूर्यकुमारी, हैद्राबाद. १०) श्रीमती ज्योती ए. मनुजा, मुंबई. ११) श्रीमती विद्या बी. परवी, मुंबई १२) ह. भ. प. लक्ष्मण मोकल, भजन मंडळी, मुंबई. २२. १३) श्री. रामचंद्र कदम, मुंबई ३४. १४) हिरालाल भेला, बंगाल. १४) श्रीसाईनाथ महिला भजनी मंडळ, शिर्डी

**माननीयांच्या भेटी**

१) मा. श्री. मिश्रा चीफ इंजिनिअर इलेक्ट्रिसिटी बोर्ड महाराष्ट्र

२) मा. श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, मुं.

३) मा. श्री. नानूभाई एन. पटेल, मेंबर ऑफ लोकसभा, न्यू दिल्ली.

४) मा. श्री. एकनाथराव निंबाळकर, राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य

५) मा. श्री. रा. ज. देवतळे, वन मंत्री महाराष्ट्र राज्य

६) मा. श्री. व्ही. चि. बांभोळकर, अ. जनरल मॅनेजर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया मुंबई.

हवापाणी :—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १५–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–२५ |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४–२५ |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०-०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–२० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–२५ |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–२५ |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–२० |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ४–७५ |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २–५० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २–०० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०–७५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–२५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) | साई किर्तनमाला, (मराठी) | २–२५ |
| (२४) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२५) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२६) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२७) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२८) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, (मराठी व इंग्रजी) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| | प्रत्येक प्रत | ०–६० |